दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशि[...]ून दर[...]सिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २३८ । गुरूवार ११ जून २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




'सहजयोग'
भाग ७९

## मानवी उत्क्रांती आणि सहज योग

'सहज' म्हणजे,'सह' म्हणजे - सोबत, आणि 'ज' म्हणजे - जन्मलेला. जो तुमच्यासोबतच जन्माला आला आहे, तो म्हणजे परमात्म्याशी एकरूप होण्याचा, योगाचा तुमचा अधिकार; यालाच सहज योग म्हणतात. सहज योग हा जेव्हा माणूस आदिम होता, जेव्हा तो अमिबा होता, तेव्हाही सहज योग अस्तित्वात होता. त्यानंतर जेव्हा तो चतुष्पाद झाला, तेव्हाही सहज योगच घडला. जेव्हापासून तो द्विपाद झाला, तेव्हाही सहज योगच कार्यरत होता. आणि जेव्हापासून तो मनुष्य झाला, तेव्हाही सहज योगच घटित झाला. आजचा जो सहज योग आहे, तो मनुष्याला त्याच्या अस्तित्वाचा खरा अर्थ सांगण्यासाठी आहे, तो त्याचा अंतिम आणि सर्वोच्च ध्येय आहे. आपल्या भारतवर्षात आदिकाळापासून अनेक ऋषी-मुनींनी मनन आणि ध्यानाद्वारे अंतर्मनातील अनेक गोष्टींचा शोध लावला. परशुरामांच्या काळात, जेव्हा परशुरामांचा जन्म झाला होता, त्या काळात लोकांनी जंगलांमध्ये याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण जगापासून स्वतःला तोडून, कडक ब्रह्मचर्याचे पालन करत, छोट्याशा गुफेत लपून त्यांनी अनेक वर्षे घोर तपस्या केली. त्यानंतर त्यांनी मनुष्याच्या आतील अत्यंत सूक्ष्म आणि गुप्त रहस्यांचा शोध लावला. परंतु, त्यांच्या या शोधकार्याचा लाभ खूपच कमी लोकांना घेता आला, कारण हे कार्य अत्यंत सूक्ष्म होते; आणि समाजात राहून हे कार्य करणे अतिशय कठीण होते. या लोकांनी आपल्या धर्मग्रंथांमध्ये किंवा पुस्तकांमध्ये, जर त्यांनी याचे महात्म्य लिहिलेही असेल, तर या सूक्ष्म तत्वांचे अनेक प्रकारे वर्णन केले आहे. ३ फेब्रुवारी १९७७ मुंबई अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी


# पंडित नेहरुंचा विक्रम आज नरेंद्र मोदींच्या नावावर

## सर्वाधिक काळ पंतप्रधान : तिसऱ्या कार्यकाळालाही २ वर्षे पूर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशाच्या राजकारणात आज एक ऐतिहासिक क्षण नोंदवला जाणार आहे. सलग तीन वेळा जनतेचा कौल मिळवत सत्तेत आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्या पंतप्रधानपदावरील ४ हजार ३९८८ दिवसांच्या कार्यकाळाचा विक्रम मागे टाकणार आहेत.पण या विक्रमावरुनही आता विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण सुरु झालंय. नेहरुंच्या कार्यकाळाची बरोबरी होईल मात्र नेहरुंची बरोबरी होणार नाही अशा शब्दात काँग्रेसनं भाजपला प्रत्युत्तर दिलंय..तर मोदींचे भविष्यातील रेकॉर्ड कुणीही मोडू शकणार नाही असा दावा भाजपनं केलाय.. पंतप्रधान मोदींच्या कारकीर्दीला १२ वर्ष पूर्ण झाल्यानिम्मित भाजपकडून मेगा प्लॅनिंग सुरु आहे. उद्यापासून प्रगती पथ यात्रा सुरु होणार असून यामध्ये सर्व खासदार, मंत्री, आमदार आणि नेते सहभागी होणार आहेत.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ मे १९५२ रोजी पहिल्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. ते सलग ४ हजार ३९७ दिवस म्हणजेच १२ वर्षे आणि १४ दिवस देशाचे पंतप्रधान राहिले होते. लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून उद्या मोदींचा सलग ४ हजार ३९८ दिवस म्हणजेच १२ वर्षे १५ दिवस पूर्ण होणार आहेत. तसेच ७ ऑक्टोबर २००१ ते २२ मे २०१४ पर्यंत गुजरातचे मुख्यमंत्री आणि २६ मे २०१४ पासून आतापर्यंत देशाचे पंतप्रधान असा त्यांचा प्रवास राहिला आहे. लोकनियुक्त सरकारांचे प्रमुख म्हणून नरेंद्र मोदींनी तब्बल ९ हजार पेक्षा जास्त दिवस पूर्ण केले आहेत.

नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून सलग तीन वेळा लोकसभा निवडणुकीत विजय मिळवून पंतप्रधानपद **(पान ४ वर)**



## फोटो वायरल करण्याची धमकी देऊन
# अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख वाढवून एका १५ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलीला ब्लॅकमेल करत तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याची धक्कादायक घटना श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून मुख्य संशयितासह त्याला मदत करणाऱ्या एकूण ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**इन्स्टाग्रामवरून ओळख आणि धमकीचे सत्र**

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी (वय १५ वर्षे) ही काष्टी येथील एका विद्यालयात इयत्ता १० वीत शिकत आहे. काही महिन्यांपूर्वी तिची इन्स्टाग्रामवरून संशयित आरोपी भैरव धेंडे याच्याशी ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाल्यानंतर आरोपीने तिच्याकडे लग्नाची मागणी घातली. मात्र, पीडितेने तिचे वय लहान असल्याचे सांगून लग्नास नकार दिला.याचाच राग मनात धरून आरोपीने माझ्याशी लग्न केले नाही तर तुझे फोटो एडिट करून सोशल मीडियावर टाकून बदनाम करीन अशी धमकी देण्यास सुरुवात केली.

**धाक दाखवून वेगवेगळ्या ठिकाणी अत्याचार**

आरोपीने पीडितेच्या याच भीतीचा गैरफायदा घेतला. २७ जानेवारी २०२६ रोजी एका वाढदिवसाच्या पार्टीचे निमित्त साधून आरोपीने पीडितेवर तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले आणि कोणाला सांगितल्यास जिवंत न सोडण्याची धमकी दिली.यानंतरही आरोपीचे मन भरले नाही. त्याने तिला एक नवीन सिम कार्ड वापरण्यास भाग पाडले. एप्रिल २०२६ मध्ये पुन्हा फोटो व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने काष्टी येथील सिद्धीविनायक मेडिकलच्यावर असलेल्या दुसऱ्या आरोपीच्या घरात नेऊन पीडितेवर पुन्हा अत्याचार केला.

**आरोपीच्या मित्रांची गुन्ह्यात साथ–** या संपूर्ण गंभीर गुन्ह्यात मुख्य आरोपीला त्याचे मित्र अल्ताफ अत्तार आणि अनिकेत जगताप यांनी वेळोवेळी मदत केल्याचे समोर आले आहे. आरोपीने पीडितेला वेगवेगळ्या ठिकाणी आणण्यासाठी आणि धमकावण्यासाठी आपल्या मित्रांच्या वाहनांचा व घराचा वापर केला. ५ जून २०२६ रोजी आरोपींनी पीडितेचे आणि मुख्य आरोपीचे एकत्र फोटो काढून तिच्या आईला व कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिली. शेवटी धीर एकवटून पीडितेने हा सर्व प्रकार आपल्या आईला सांगितला.

**पोलिसांत गुन्हा दाखल, तपास सुरू –**पीडितेच्या आईने ६ जून २०२६ रोजी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर फिर्याद नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी भैरवनाथन धेंडे (रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा)अल्ताफ नुरमोहम्मद अत्तार(रा. भैरवनाथ चौक, काष्टी)अनिकेत शेखर जगताप (रा. भैरवनाथ चौक, काष्टी)या तिघांविरोधात पीडितेवर अत्याचार करणे , बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो ) कायदा आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.


# पुरुषोत्तमपुरीत बोट बुडाली : दोन महिलांचा दुर्दैवी अंत

## स्थानिकांच्या धाडसाने ३५ भाविकांचे प्राण वाचले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** आध्यात्मिक श्रद्धेने भरलेल्या यात्रेचे वातावरण क्षणात शोकमय झाले. बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे बुधवारी सकाळी गोदावरी नदीपात्रात भाविकांना घेऊन जाणारी बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत बुलडाणा जिल्ह्यातील दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला, तर १२ महिला जखमी झाल्या. स्थानिक नागरिक, नावाडी आणि बचावकार्य करणाऱ्यांच्या तत्परतेमुळे तब्बल ३५ भाविकांचे प्राण वाचविण्यात यश आले.





अधिकमास यात्रेनिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे हजारो भाविकांची गर्दी होत आहे. देवदर्शन आणि धार्मिक विधींसाठी आलेल्या महिलांचा एक गट सकाळी गोदावरी नदीपात्रातून बोटीने प्रवास करत होता. श्रद्धा, उत्साह आणि देवदर्शनाची ओढ मनात घेऊन या महिला बोटीत बसल्या होत्या. मात्र काही क्षणांतच हा आनंदाचा प्रवास भीषण दुर्घटनेत बदलला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, नदीच्या मध्यभागी पोहोचल्यानंतर बोटीचा अचानक तोल गेला. बोटीत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसविण्यात आल्याने ती एका बाजूला झुकली आणि काही क्षणांतच पाण्यात उलटली. बोट

**या दुर्घटनेत १२ महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर आष्टी ग्रामीण रुग्णालयासह काही खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींची प्रकृती सध्या स्थिर आहे. लोणार तालुक्यातील कुंभेफळ, बोरी, किन्ही आणि बीबी येथून दर्शनासाठी आलेल्या १७ महिला सुखरूप असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

उलटल्याचे लक्षात येताच महिलांनी आरडाओरडा सुरू केला. नदीपात्रात एकच गोंधळ उडाला.

किनाऱ्यावर उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी आणि अनुभवी नावाड्यांनी प्रसंगावधान दाखवत तत्काळ नदीत उड्या मारल्या. जीवाची पर्वा न करता त्यांनी महिलांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले. काहींनी दोरखंडांचा आधार घेतला, तर काहींनी पोहत जाऊन महिलांना सुरक्षित किनाऱ्यावर आणले. या धाडसी प्रयत्नांमुळे ३५ भाविकांचे प्राण वाचले. मात्र या दुर्घटनेत बुलडाणा जिल्ह्यातील कुंभेफळ येथील कांताबाई ज्ञानदेव आंधळे (वय ६०) आणि चोरपांगरा येथील प्रमिला शेषराव राठोड (वय ५५) या दोन महिला मृत्युमुखी पडल्या. धार्मिक भावनेने दर्शनासाठी आलेल्या या महिलांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या गावांमध्ये शोककळा पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच प्रशासन, पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी **(पान ४ वर)**

## तिघांकडून बॉन्डचे उल्लंघन, ९० हजारांची रक्कम वसुल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** चांगल्या वर्तणुकीसाठी कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर यांच्यापुढे करण्यात आलेल्या बंध पत्र तथा बॉन्डचे उल्लंघन केले म्हणून तिंघाकडून ९० हजारांची बॉन्डची रक्कम वसुल करण्यात आली.

मिळालेली सविस्तर माहिती अशी की,अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या कार्यालयाच्या हद्दीतील गंभीर स्वरूपांच्या दखलपात्र गुन्हा दाखल येण्याचा संभव असणाऱ्या व्यक्तीकडून बॉन्ड लिहून घेतला.सदर च्या बॉन्ड नुसार संबधित व्यक्तींनी बॉन्ड च्या कालवधीत कोणताही गुन्हा करायचा नाही, कोणाच्याही मुलभुत हक्कावर गदा आणायची नाही,शरीराविरुद्ध मालमत्ते विरुद्ध गुन्हे करायचे नाही,सागितल्याप्रमाणेच हजेरी लावणे बंधपत्राच्या अटीचा भंग केल्यास अनामत रक्कमेचा वसुल करण्यात येत असतो. सदरचे नियमांचा भंग केला म्हणून **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### पोहता येत नाही... पोलीस भरतीत तरुणीचा मृत्यू

जालना, प्रतिनिधी : पोलीस दलात भरती होऊन खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या १९ वर्षीय तरुणीचा खदाणीतील खोल पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून प्रशिक्षण अकादमीच्या निष्काळजीपणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी पोलीस भरतीची तयारी करत होती. प्रशिक्षणाचा भाग म्हणून तिला खदाणीतील पाण्यात उतरवण्यात आले. मात्र, तिला पोहता येत नसल्याची माहिती प्रशिक्षण देणाऱ्यांना आधीपासूनच देण्यात आली होती, असा दावा तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. तरीदेखील तिला पाण्यात उतरवण्यात आल्याने हा दुर्दैवी प्रकार घडल्याचा आरोप करण्यात येत आहे. घटनेनंतर तरुणीला तातडीने बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले. या घटनेनंतर कुटुंबीयांनी प्रशिक्षण अकादमीच्या हलगर्जीपणावर तीव्र संताप व्यक्त केला असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## शाळा १५ जूनला सुरू होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील शाळा सुरू होण्याच्या वेळापत्रकावरून सुरू असलेला घोळ सुरु असतानाच आधीच्या निर्णयाला २४ तास उलटत नाहीत तोच शिक्षण विभागाने शाळा सुरू करण्याबाबतचे आपले पूर्वीचे परिपत्रक रद्द केले. मुंबई, पुण्यासह उर्वरित महाराष्ट्रात १५ जून आणि विदर्भासाठी २२ जून अशी तारीख जाहीर करण्यात आली होती, मात्र आता या संपूर्ण नियोजनात मोठा फेरबदल करण्यात आला आहे. शिक्षण संचालकांनी जारी केलेले आधीचे आदेश पत्र आता पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे.

विदर्भातील प्रचंड उष्णता आणि कडक ऊन लक्षात घेता तेथील शाळा १५ जूनऐवजी सोमवारी २२ जूनपासून सुरू करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले होते. तसेच २२ जून ते ३० जून या कालावधीत विदर्भातील शाळा केवळ सकाळच्या सत्रात भरवण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले होते. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून शाळांच्या तारखा थेट पुढे ढकलल्या आहेत. आता उन्हाच्या तीव्रतेमुळे विदर्भातील शाळा थेट ३० जूनपासून सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

# ममता बॅनर्जींना काँग्रेस उपाध्यक्षपदाची ऑफर

## बंगालच्या राजकारणात सोनिया गांधींची एन्ट्री

**नवी दिल्ली :** भाजपकडून टीएमसीवर होत असलेल्या राजकीय हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करावा, अन्यथा भाजप 'आप'प्रमाणे त्यांना त्रास देईल, असा प्रस्ताव सोनिया गांधी यांनी ममता बॅनर्जी यांना प्रस्ताव दिला आहे. पक्षातील लोकही अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात आहेत, त्यामुळे सध्या त्यांच्यासाठी परिस्थिती कठीण झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांनी स्वतः त्यांना वैयक्तिकरित्या फोन केला होता. सूत्रांनी एबीपी न्यूजला असेही सांगितले की, ममता बॅनर्जी यांनी यावर



निर्णय घेण्यासाठी काही दिवसांची मुदत मागितली आहे. सूत्रांच्या मते, त्यांना असा प्रस्ताव देण्यात आला आहे की, जर त्यांनी टीएमसीमध्ये विलीनीकरण केले, तर त्यांना राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि अभिषेक बॅनर्जी यांना महासचिव बनवता येईल.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्ती सुष्मिता देव यांनी बुधवारी राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यासोबतच्या त्यांच्या भेटीचा एक फोटो समोर आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुष्मिता भाजपमध्ये सामील होऊ शकतात. गेल्या तीन दिवसांत टीएमसीच्या २ राज्यसभा खासदारांनी राजीनामा दिला आहे. यापूर्वी, ८ जून रोजी सुखेंदू शेखर यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन पक्ष सोडला होता. सध्या टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. यापूर्वी, ३ जून रोजी बंगालच्या ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी ऋतब्रता बॅनर्जी यांना आपला नेता म्हणून नियुक्त करून एक वेगळा गट स्थापन केला होता.

८ जून रोजी, टीएमसीच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. खासदार आणि टीएमसीच्या माजी नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी सांगितले की, खासदारांच्या स्वाक्षरीचे एक पत्र लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना पाठवण्यात आले आहे. त्यात स्वतंत्र संसदीय गटाच्या स्वरूपात वेगळ्या आसनव्यवस्थेची मागणीही करण्यात आली आहे.

३ जून रोजी, टीएमसीमधील पहिल्या बंडाची बातमी समोर आली. ५८ बंडखोर आमदारांनी पक्षातून काढून टाकलेले आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांना आपले नेते म्हणून निवडले. त्यांनी विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांना पाठिंब्याचे पत्र सादर केले आणि ऋतब्रता यांना विरोधी पक्षनेते म्हणून घोषित करण्याची मागणी केली. अध्यक्षांनी या मागणीला मंजुरी दिली.



# १२ वर्षांच्या कार्यकाळाला पूर्णविराम नाही...

## जनतेचा विश्वास हेच सर्वात मोठे बळ : पंतप्रधान मोदी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारला सत्तेत येऊन १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे एनडीएची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस एनडीए-शासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि आघाडीतील प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्ते व नेत्यांना संबोधित करताना जनतेच्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त

**२०१४ पूर्वी देशात अस्थिरता आणि धोरणात्मक गोंधळाचे वातावरण होते. काँग्रेसच्या कारभारामुळे जनतेचा विश्वास डळमळीत झाला होता. अशा परिस्थितीत देशवासीयांनी एनडीएवर विश्वास व्यक्त केला आणि स्थिर व निर्णायक सरकारची जबाबदारी सोपवली, असेही त्यांनी नमूद केले.**

केली. मी माझ्या आयुष्यात हा टप्पा गाठेन, अशी कधी कल्पनाही केली नव्हती. भारतमातेची इतकी वर्षे सेवा करण्याची संधी मिळणे हे देवाच्या कृपेनेच शक्य झाले आहे. माझ्यासाठी जनताच देव असून देशवासीयांच्या प्रेमाबद्दल मी सदैव ऋणी आहे, असे मोदी म्हणाले.

मोदी म्हणाले की, २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर देशातील सामान्य माणसामध्ये नवी आशा निर्माण झाली. त्या आशेला बळ देण्याची जबाबदारी एनडीए परिवाराने यशस्वीपणे पार पाडली. गेल्या १२ वर्षांत आम्ही जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी काम केले. काँग्रेसवर टीका करताना पंतप्रधानांनी पूर्वीच्या सरकारांवर हजारो कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचे आरोप केले. काँग्रेसच्या काळात देशाला भ्रष्टाचार, अस्थिरता आणि विकासाच्या अभावाचा सामना करावा लागला. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली विकासाची दिशा मिळाली होती, मात्र २००४ नंतर देश पुन्हा काँग्रेसच्या **(पान ४ वर)**

# विक्रमाच्या पलीकडचे राजकारण

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

देशाच्या लोकशाही इतिहासात काही क्षण हे केवळ आकड्यांपुरते मर्यादित राहत नाहीत. ते एका युगाचे, एका राजकीय प्रवाहाचे आणि जनमताच्या बदलत्या स्वरूपाचे प्रतीक ठरतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या सलग लोकनियुक्त पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाची बरोबरी करत त्यापुढे वाटचाल सुरू केली आहे, ही अशीच एक घटना आहे. या विक्रमामुळे देशभरात राजकीय चर्चा रंगली आहे. समर्थकांकडून मोदी यांचे कौतुक होत असताना विरोधकांकडून नेहरूंच्या योगदानाची आठवण करून देत तुलना करण्याचा प्रयत्न होत आहे. मात्र या चर्चेकडे केवळ व्यक्तिपूजक किंवा पक्षीय दृष्टिकोनातून न पाहता भारतीय लोकशाहीच्या व्यापक संदर्भात पाहण्याची गरज आहे.

जवाहरलाल नेहरू आणि नरेंद्र मोदी यांची तुलना करणे हे मुळात दोन भिन्न काळांची तुलना करण्यासारखे आहे. नेहरूंनी स्वातंत्र्यानंतरच्या नवजात भारताचे नेतृत्व केले. देशाची राज्यघटना नव्याने रुजत होती, लोकशाही संस्थांची उभारणी सुरू होती, अर्थव्यवस्था मर्यादित होती आणि देशासमोर राष्ट्रनिर्मितीचे आव्हान होते. दुसरीकडे नरेंद्र मोदी यांनी जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि प्रबळ माध्यमयुगातील भारताचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे दोघांची तुलना केवळ कार्यकाळाच्या दिवसांमध्ये मोजणे पुरेसे ठरत नाही.

तरीही एक सत्य नाकारता येणार नाही. सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवून केंद्रात सत्ता टिकवून ठेवणे हे भारतीय राजकारणात अत्यंत दुर्मीळ यश आहे. २०१४ मध्ये भ्रष्टाचारविरोधी वातावरण, काँग्रेसविरोधी जनमत आणि विकासाच्या आश्वासनांच्या जोरावर मोदी सत्तेत आले. २०१९ मध्ये राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा आणि मजबूत नेतृत्वाची प्रतिमा त्यांच्या बाजूने गेली. तर २०२४ मध्ये बहुमत कमी झाले असले तरी त्यांनी पुन्हा सत्तेची सूत्रे हाती ठेवली. या सलग विजयांमुळे मोदी हे केवळ भाजपचे नेते राहिले नाहीत, तर भारतीय राजकारणातील एक स्वतंत्र राजकीय घटना बनले.

मोदी सरकारच्या समर्थकांकडे त्यांच्या कामगिरीची मोठी यादी आहे. डिजिटल इंडिया, जनधन योजना, उज्ज्वला योजना, स्वच्छ भारत अभियान, पायाभूत सुविधांवरील मोठी गुंतवणूक, जलदगती महामार्ग, वंदे भारत रेल्वे, जी-२० शिखर परिषद, चंद्रयान मोहिमेचे यश, काश्मीरमधील कलम ३७० रद्द करणे यांसारख्या निर्णयांचा उल्लेख समर्थक सातत्याने करतात. जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उंचावल्याचा दावा देखील केला जातो.

मात्र या चित्राची दुसरी बाजूही आहे. विरोधकांच्या मते, मोदी सरकारच्या काळात बेरोजगारी, महागाई, शेतकरी प्रश्न, सामाजिक ध्रुवीकरण आणि लोकशाही संस्थांवरील दबाव वाढला आहे. संसदेत चर्चा कमी होत असल्याचा आरोप केला जातो. केंद्रीय तपास यंत्रणांच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित केले जातात. प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, विरोधकांवरील कारवाया आणि संघराज्य व्यवस्थेतील तणाव हे देखील चर्चेचे विषय आहेत. त्यामुळे मोदींच्या विक्रमाचे स्वागत करणाऱ्यांइतकेच त्यावर टीका करणारेही मोठ्या संख्येने आहेत.

समाज माध्यमांवर उमटलेल्या प्रतिक्रिया याच राजकीय विभाजनाचे प्रतिबिंब आहेत. एका बाजूला मोदींना "अतुलनीय नेता", "नवभारताचे शिल्पकार" अशा विशेषणांनी गौरविण्यात आले. दुसऱ्या बाजूला नेहरूंच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची, सार्वजनिक क्षेत्राच्या उभारणीची, आयआयटी, आयआयएम, धरणे आणि लोकशाही संस्थांच्या निर्मितीची आठवण करून देत "विक्रम वेगळा आणि योगदान वेगळे" असे मत व्यक्त करण्यात आले. या वादातून एक गोष्ट स्पष्ट होतेभारतीय राजकारणात नेहरू आणि मोदी हे दोघेही आपल्या-आपल्या काळातील प्रभावी राजकीय प्रतीक बनले आहेत.

खरे पाहता, लोकशाहीमध्ये कोणत्याही नेत्याचे मूल्यमापन केवळ कार्यकाळाच्या लांबीवर होत नाही. त्या कार्यकाळाने देशाला कोणती दिशा दिली, कोणती आव्हाने निर्माण केली आणि कोणत्या संधी उपलब्ध करून दिल्या, यावर अंतिम निर्णय इतिहास देत असतो. नेहरूंना आजही त्यांच्या समर्थकांकडून आधुनिक भारताचे शिल्पकार मानले जाते, तर टीकाकार त्यांच्यावर अनेक धोरणात्मक चुका केल्याचा आरोप करतात. त्याचप्रमाणे मोदींबाबतही अंतिम निर्णय आज नव्हे तर इतिहासच देईल.

या विक्रमाचा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे भारतीय मतदारांचा बदलता स्वभाव. देशातील मतदार आता नेतृत्व, प्रतिमा, संघटनशक्ती आणि संवादकौशल्य यांना मोठे महत्त्व देतात. नरेंद्र मोदी यांनी या सर्व बाबींमध्ये स्वतःची स्वतंत्र छाप निर्माण केली आहे. त्यामुळेच ते नेहरूंच्या विक्रमापर्यंत पोहोचू शकले.

आजचा दिवस हा केवळ एका व्यक्तीच्या विक्रमाचा नाही; तो भारतीय लोकशाहीच्या सातत्याचा आणि जनमताच्या शक्तीचा पुरावा आहे. मात्र विक्रमांची नोंद इतिहासात होते, तर कार्याचे मूल्यमापन भविष्यातील पिढ्या करतात. नरेंद्र मोदी यांनी नेहरूंचा विक्रम मागे टाकला असला तरी आता त्यांच्यासमोर स्वतःचा वारसा अधिक सक्षमपणे सिद्ध करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. इतिहासात नाव नोंदविणे महत्त्वाचे असते, परंतु इतिहास घडविणे त्याहून अधिक महत्त्वाचे असते.

# देवस्थाने व मंदिरांमुळे संस्कृती टिकून

## गुरुवर्य भास्करगिरी महाराज



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** देवस्थाने व धार्मिक स्थळांमुळे आपली संस्कृती टिकली असून, ही मंदिरे आपल्या संस्कृतीचा खरा पाया आहेत. टाकळीभान येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अतिशय पुरातन प्रति पंढरपूर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व श्री संत तुकाराम महाराजांच्या नव्याने होत असलेल्या मंदिरांडरे हा पाया अधिक भक्कम करण्याचे काम टाकळीभानकरांनी केले असल्याचे प्रतिपादन हभप. गुरुवर्य महंत भास्करगिरी महाराज यांनी केले. टाकळीभान येथील प्रती पंढरपूर समजल्या जाणाऱ्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या वरील बाजूस झालेल्या नूतन सभामंडपाचे उद्घाटन ह. भ प. महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराजांच्या हस्ते पार पडले तसेच नव्याने सुरू असलेल्या श्री संत तुकाराम महाराज मंदिरास महाराजांनी भेट दिली. याप्रसंगी त्यांनी ग्रामस्थ व उपस्थितांना उदबोधित केले. प्रारंभी उपस्थितांचे स्वागत राहुल पटारे यांनी केले तर उपसरपंच कान्हा खंडागळे यांनी मंदिराच्या बांधकामा संदर्भात, लोकवर्गणीतून झालेली मदत व लोकप्रतिनिधी यांनी मंदिरासाठी केलेले सहकार्य, व मंदिर बांधकामा संदर्भात पुढील वाटचालयाबद्दलची माहिती दिली.

यावेळी महाराज पुढे बोलताना म्हणाले की मानवतेचा संदेश देण्याचे काम धर्मातून व संत महात्म्याच्या कार्यतून होत असते त्यामुळे देवस्थाने व धार्मिक स्थळे टिकविण्याचे व जीर्णोद्धाराचे कार्य चांगल्या व निकोप समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.याप्रसंगी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष माजी सभापती नानासाहेब पवार, सोसायटीचे चेअरमन मंजाबापू थोरात, शिवसेनेचे दादासाहेब कोकणे, मा. चेअरमन एकनाथ पटारे, नानासाहेब लेलकर, व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, ,बापूसाहेब पटारे,बंडोपंत पटारे, डॉ. श्रीकांत भालेराव,प्रा. जयकर मगर,आबासाहेब ढूस, रोहिदास पटारे, खंडेराव गवांदे सर, ह भ प बाळासाहेब महाराज कानडे,ह भ प दत्तात्रय बहिरट महाराज, ह.भ.प लक्ष्मण नांगरे महाराज,ह भ प संतोष पटारे महाराज, ह भ प राधेश्याम महाराज पांडागळे, ह भ प सुदाम महाराज चौधरी, ह भ प सुदाम महाराज होन, ह भ प रविंद्र महाराज गांगुर्डे, भ प शुभम महाराज बनकर, डॉ. सोनल भालेराव, किरणराव धुमाळ, लहान भाऊ नाईक, गोरक्षनाथ जाधव,लहान भाऊ पवार, शिवाजीराव वखरे, देविदास कोकणे, सुधीर मगर, बाळासाहेब कोकणे, बाळासाहेब पटारे, राजेंद्र कोबरने, सुभाष ब्राह्मणे, तान्हाजी पटारे,प्रकाश काळे,आदी सह संत तुकाराम महाराज मंदिर विश्वस्त मंडळ, सद्गुरु किसनगिरी बाबा भक्त मंडळाचे सर्व सदस्य, महिला पुरुष भजनी मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी महाराजांच्या हस्ते ह भ प ऋषिकेश महाराज वाघुले यांच्या आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेचे उद्घाटन ही राम मंदिर येथे पार पडले.

# वाकडीच्या संभाजीनगरला स्वतंत्र स्मशानभूमीसाठी १० गुंठे जागा मंजूर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी**, राहाता तालुक्यातील वाकडी गावांतर्गत नव्याने निर्माण झालेल्या संभाजीनगर महसुली गावासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने स्मशानभूमीसाठी १० गुंठे शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. संभाजीनगर येथे स्वतंत्र दहनभूमी नसल्यामुळे ग्रामस्थांना अंत्यसंस्कारासाठी इतर ठिकाणी जावे लागत होते. या गैरसोयीबाबत ग्रामस्थांनी आमदार कोल्हे यांच्याकडे मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठपुरावा केला. महसूल विभागाच्या निर्देशानुसार तहसीलदार राहाता व मंडळ अधिकारी पुणतांबा यांनी गट क्रमांक ५२ मधील जागेची पाहणी केली. या गटातील ०.३७ हेक्टर शासकीय क्षेत्रापैकी ०.१० हेक्टर म्हणजेच १० गुंठे जागा स्मशानभूमीसाठी योग्य असल्याचे आढळले. सदर जागा मोकळी, पडीत व अतिक्रमणमुक्त असल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १३(४) नुसार आवश्यक कार्यवाही सुरू असून नगररचना विभागाचा अभिप्रायही मागविण्यात आला आहे. भूमि अभिलेख विभागाकडून अधिकृत मोजणी पूर्ण झाल्यानंतर जागेचा ताबा ग्रामपंचायतीकडे दिला जाणार आहे. त्यामुळे संभाजीनगर ग्रामस्थांची अनेक वर्षांची स्मशानभूमीची मागणी पूर्ण होण्याच्या मार्गावर आली आहे.

# शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक कॉलेजमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : वडाळा महादेव येथील शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचा २८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना व कम्युनिटी मेडिसिन विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रम शिवा ट्रस्टचे चेअरमन डॉ. बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवंशी मच्छिंद्र यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजारोहण करून करण्यात आले. संस्थेचे संचालक दिलीपदादा पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपस्थितांनी विद्यापीठ गीत व राष्ट्रगीत गायन करून विद्यापीठाला अभिवादन केले. प्रमुख पाहुणे दिलीपदादा पवार यांनी आपल्या मनोगतात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या २८ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही विद्यापीठामार्फत उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक व क्लिनिकल संधींबाबत आपले अनुभव व्यक्त केले. कार्यक्रम शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. रिझवान अहमद यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी सुप्रियादीदी सुळे कॉलेजचे प्राचार्य प्रशांत वाघमारे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. रिझवान अहमद यांनी उपस्थितांचे आभार मानले. वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध विभागांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.




# श्री क्षेत्र अंतापूर ताहाराबाद दिशेने दावल मलिक बाबा पालखीचे प्रस्थान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर आणि आश्वी येथील दावल मलिक बाबा भक्त परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पायी दिंडीचे मंगळवारी (दि. ९) श्री क्षेत्र अंतापूर ताहाराबादच्या दिशेने भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. या दिंडीत मोठ्या संख्येने भाविक शिस्तबध्द पध्दतीने सहभागी झाले होते.

दिंडीचे प्रस्थान होण्यापूर्वी मंगळवारी सकाळी उंबरी बाळापूर येथे संगमनेर पंचायत समितीचे माजी सदस्य सरुनाथ उंबरकर यांच्या हस्ते आरती पार पडली. यानंतर रासपचे तालुकाप्रमुख मच्छिंद्र खेमनर (जानकर) यांनी उपस्थित भाविकांचे स्वागत करत दिंडीचे आदर-आतिथ्य केले.याप्रसंगी राधाकृष्ण चोपडे, नानासाहेब उंबरकर, गणेश डोखे, भारत वाकचौरे, दीपक होडगर, लक्ष्मण जुंधारे, नाना गेंठे, मयुर खेमनर, अनिल वाघमारे, सुरेश थोरात, पोपट खेमनर, पवन डोखे, संतोष बिडवे, महेश बिडवे, भारत होडगर, सार्थक होडगर, यास्मिन शेख, अनिता वाघमारे आणि इंदुबाई डोखे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.

दरम्यान, आरतीनंतर गावातून दावल मलिक बाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. वाजत-गाजत आणि भक्तीच्या जयघोषात निघालेली ही दिंडी उंबरी बाळापूर आणि आश्वी मार्गे श्री क्षेत्र अंतापूर ताहाराबादच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी पालखीचे दर्शन घेण्यासाठी मार्गावर ठिकठिकाणी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



# मरणोत्तर नेत्रदानातून दृष्टीहीनांना देऊया नवजीवन : डॉ. साताप्पा खरबडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** :आपणा सर्वांना डोळे ही ईश्वराने दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. आपल्या देशात अंध व्यक्तींची संख्या जास्त आहे. या अंध व्यक्तींच्या जीवनात जर प्रकाश आणायचा असेल तर मरणोत्तर दृष्टीदानाचा संकल्प हा प्रत्येकाने करायला हवा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाच्या वतीने डॉ. अण्णासाहेब शिंदे सभागृहात नेत्रदान जनजागृती व मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राहुरी शहरातील प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. संदीप निमसे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता



डॉ. सचिन नलावडे, पदव्युत्तर महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सुरेश दोडके, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी व विद्यापीठ दवाखान्याच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली हिले उपस्थित होते.

यावेळी डॉ. संदीप निमसे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की जगामध्ये सर्वात जास्त अंध व्यक्ती भारतात आहेत. नेत्रदानाबाबत समाजात मोठे अज्ञान आहे. आपल्या मरणोत्तर नेत्रदानाने या अंध व्यक्तींना नविन जीवन मिळू शकते. मृत्यू झाल्यानंतर सहा तासाच्या आत नेत्रदान व्हायला हवे यासाठी समाजाची मरणोत्तर नेत्रदानाबाबतची जागृकता महत्वाची ठरु शकते. यावेळी त्यांनी डोळ्यांची रचना, कार्य, डोळ्यांचे आजार, घ्यावयाची काळजी व नेत्रदानाविषयीचे अज्ञान व अंधश्रद्धा यावर मार्गदर्शन केले. यावेळी आयोजीत करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिराचा लाभ विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल सोनवणे याने केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. विलास आवारी यांनी करून दिली. कार्यक्रमाचे आभार डॉ. सचिन नलावडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षण, औद्योगिक वसाहत व जलयात्रेमुळे विकासाचा वेग वाढला : अभय शेळके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राज्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक घडामोडींमध्ये प्रभावी नेतृत्व करत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिर्डी विधानसभा मतदारसंघाला राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले आहे. मराठा आरक्षण प्रश्नावर मनोज जरांगे यांच्यासोबत यशस्वी चर्चा, राहुरी विधानसभा व विधानपरिषद निवडणुकीतील महत्वाची भूमिका, तसेच शिर्डी औद्योगिक वसाहतीत उभा राहिलेला देशातील खासगी क्षेत्रातील पहिला तोफगोळे निर्मिती प्रकल्प यामुळे विखे पाटील यांचे नेतृत्व अधिक ठळकपणे समोर आले असल्याचे प्रतिपादन उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी केले.

**अभय शेळके (उपनगराध्यक्ष, शिर्डी) म्हणाले :**
जलसंपदा विभागाला लोकाभिमुख करण्याचे काम मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. गोदावरी कालवे व वितरिकांच्या नूतनीकरणाची कामे हाती घेतली. गोदा ते नर्मदा जलयात्रा यशस्वी करत पश्चिमेचे पाणी पूर्वेला आणण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला त्यांनी गती दिली आहे.



पत्रकारांशी बोलताना शेळके म्हणाले की, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यासोबत विखे पाटील यांनी अनेकवेळा सकारात्मक चर्चा करत तोडगा काढण्याची भूमिका निभावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सुविधा व सवलती लागू करण्याचा घेतलेला निर्णय हा ऐतिहासिक आणि क्रांतिकारी असल्याचे त्यांनी सांगितले.

राहुरी विधानसभा आणि विधानपरिषद निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी घडत असतानाही विखे पाटील यांनी प्रभावी समन्वय साधत मार्ग काढला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेला विश्वास त्यांनी सार्थ ठरवला. त्यामुळे राहुरी मतदारसंघात भाजपचे एक नव्हे तर दोन आमदार निवडून आले. विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार प्राजक्त तनपुरे आणि आमदार अक्षय कर्डिले यांनीही सार्वजनिकरित्या विखे पाटील यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली असल्याचे शेळके म्हणाले.

शिर्डी औद्योगिक वसाहतीसाठी शेती महामंडळाची तब्बल ५०० एकर जमीन हस्तांतरित करून विकासाचा नवा अध्याय सुरू करण्यात आला. या ठिकाणी देशातील खासगी क्षेत्रातील पहिला तोफगोळे निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. त्यामुळे शिर्डी मतदारसंघ राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आला.

याच औद्योगिक वसाहतीत टाटा उद्योगसमूहाने कौशल्य विकास प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण आणि रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. आगामी काळात या औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून तब्बल दहा हजार युवकांना रोजगार मिळणार असल्याचा विश्वास शेळके यांनी व्यक्त केला.

# जीवनशैलीत बद्दल करुन आरोग्याची काळजी घ्या : डॉ. सुप्रिया ढोकणे

## नामदारांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** आयुर्वेदाच्या माध्यमातून उपचार पद्धती अधिक प्रभावी आणि सोयीची होत असून निरोगी जीवनासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम आणि आजार होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पायरेन्स संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे-पाटील यांनी केले.

राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दाढ बुद्रुक येथे समस्त ग्रामस्थ, जनसेवा मंडळ तसेच पायरेन्स संस्थेच्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटल व आयुर्वेद महाविद्यालय, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात त्या बोलत होत्या.




यावेळी विखे पाटील कारखान्याचे संचालक सुनील तांबे, माजी संचालक प्रतापराव तांबे, सरपंच तात्यासाहेब सातपुते, उपसरपंच नकुल तांबे, पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर, डॉ. योगेश निघुते, डॉ. श्याम भुतडा, सुभाष तांबे, अशोक दहिवळकर, भाऊसाहेब पाळंदे, डॉ. दीपक तांबे, डॉ. प्रमोद बोऱ्हाडे,बाळासाहेब सांगळे,सौ. सविता गाडेकर, संजय गाडेकर, प्रशांत बनसोडे, कैलास तांबे, राजेंद्र तांबे, प्रमोद बनसोडे, बाळासाहेब पाळंदे, सचिन वाणी, रवींद्र सातपुते, जॉन पाळंदे,अभिमन्यू कुमकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.डॉ. सुप्रिया ढोकणे-पाटील म्हणाल्या की, विखे पाटील परिवार सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिला आहे. मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून गोरगरीब जनतेला मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. दाढ बुद्रुक येथे आयोजित आरोग्य शिबिर हा त्याचाच एक भाग असून त्यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या आयुर्वेदिक हॉस्पिटलमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होत आहे.

शंभर खाटांच्या सुसज्ज आयुर्वेदिक रुग्णालयाच्या माध्यमातून विविध उपचार व सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. मोफत आरोग्य तपासणी शिबिरातून नागरिकांना विविध उपचारांमध्ये सवलतींचाही लाभ मिळत आहे. आयुर्वेद केवळ उपचारपद्धती नसून निरोगी जीवनशैलीचा आधार आहे. त्यामुळे संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारून प्रत्येकाने निरोगी राहण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. श्याम भुतडा यांनी आयुर्वेदिक हॉस्पिटलमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती दिली. प्रास्ताविकात उपसरपंच नकुल तांबे यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. यामध्ये आरोग्य शिबिर, आधार कार्ड नोंदणी शिबिर, महिलांसाठी रक्त तपासणी, एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप, आयुष्मान कार्ड शिबिर आदी उपक्रमांचा समावेश आहे. तसेच मंत्री विखे पाटील यांना उत्तम आरोग्य लाभावे यासाठी सामुदायिक रामरक्षा पठण, महामृत्युंजय मंत्रजप, हनुमान चालीसा, मल्हारी महात्म्य पठण, गंगापूजन व गंगा आरतीचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रशांत बनसोडे यांनी केले.

# कल्पेश पवार यांची मुंबई महानगरपालिकेत एक्झिक्युटिव्ह असिस्टंटपदी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील निळवंडे गावचे सुपुत्र कल्पेश मच्छिंद्र पवार यांची मुंबई महानगरपालिकेत (बीएमसी) एक्झिक्युटिव्ह असिस्टंट या प्रतिष्ठित पदावर निवड झाली आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून त्यांनी हे यश संपादन करत ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर कल्पेश पवार यांनी हे यश मिळविले. ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे येत मुंबईसारख्या महानगरातील शासकीय सेवेत मानाचे स्थान मिळवल्याने त्यांच्या कुटुंबासह निळवंडे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या निवडीमुळे गावातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा व शासकीय सेवेकडे आकर्षण निर्माण झाले असून उत्साहाचे वातावरण आहे.




कल्पेश पवार यांच्या यशाचे वृत्त समजताच ग्रामपंचायत सदस्य विकास चांगदेव पवार, प्रभाकर रामभाऊ पवार, भाऊसाहेब रामनाथ पवार यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुनीलभाऊ उकिरडे आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या पुढील शासकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### प्रफुल्ल खताळ बनले केंद्रीय गृह मंत्रालयात प्रशासकीय अधिकारी



**संगमनेर** : तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र प्रफुल्ल अशोक खताळ यांनी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून उल्लेखनीय यश संपादन करत भारत सरकारच्या केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत प्रशासकीय अधिकारी (Executive Grade-2) पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे धांदरफळ खुर्दसह संपूर्ण संगमनेर तालुक्याच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रफुल्ल खताळ यांचे लोणी येथील प्रवरा पब्लिक स्कुल शिक्षण झाले. शालेय जीवनापासूनच अभ्यासात हुशार आणि ध्येयवादी असलेल्या प्रफुल्ल यांनी पुढील शिक्षणासाठी पुणे येथील व्ही आय टी मध्ये प्रवेश घेत केमिकल इंजिनिअरिंगची पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचा मनाशी निश्चय पक्का केला.अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून परीक्षा दिल्या त्या परीक्षेत यश मिळाले नाही.मात्र खचून न जाता खताळ यांनी. अनेक आव्हानांचा सामना करत केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत प्रशासकीय अधिकारी (Executive Grade-2) ची परिक्षा दिली.पहिल्याच प्रयत्नांमध्ये यश मिळाले आणि प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले. त्यांच्या या निवडीबद्दल आमदार अमोल खताळ आणि मंत्रालयातील महसूलचे सह सचिव अजित देशमुख यांच्यासह त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

### गणेश शिंदे यांची राज्य संघटकपदी निवड



**राहुरी** : निसर्ग आणि सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण कार्यशाळा राळेगणसिद्धी येथे पद्मभूषण डॉ.अण्णासाहेब हजारे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी राहुरी येथील वरवंडी शाळेतील आदर्श अध्यापक गणेश शिंदे यांच्या पर्यावरण कार्याची दखल घेऊन मंडळाचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे यांनी गणेश शिंदे यांची राज्य संघटक म्हणून निवड केली. याबद्दल राहुरी येथे प्राचार्य अरूण तुपविहिरे, पत्रकार आर आर जाधव, अशोक मंडलिक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी भिंगारदिवे, किशोर आडसुरे उपमुख्यापक बाळासाहेब डोंगरे यांनी गणेश शिंदे यांचे अभिनंदन केले.

### सेंट झेवियर्सच्या अनुराग वैद्यची इस्त्रो सहलीसाठी निवड



**श्रीरामपूर** : जनसेवा प्रतिष्ठान, राहुरी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला त्यामध्ये सेंट झेवियर्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, श्रीरामपूर. येथील इयत्ता नववीचा विद्यार्थी अनुराग संजय वैद्य याने ८५.३३% गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. अनुरागच्या या उज्वल यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापक रेव्ह. फा. रॉबर्ट दास, प्राचार्या सौ. मीनाक्षी ब्राह्मणे, समन्वयक मिलाग्रीन कदम तसेच आनंद पटेकर यांनी त्याचे विशेष अभिनंदन करून भावी वाटचालीस दिल्या. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग यांनीही त्याच्या यशाचे कौतुक केले. या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीमुळे अनुरागची इस्रो (ISRO) शैक्षणिक सहल यासाठीही निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून इतर विद्यार्थ्यांसाठीही तो प्रेरणादायी ठरला आहे. अनुरागच्या या यशामागे त्याची मेहनत, जिज्ञासू वृत्ती, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले असल्याची भावना शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली. सर्व स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे दिल्या. तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग यांनीही त्याच्या या यशाचे कौतुक केले.

# उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्यासाठी तहसीलवर आरक्षण बचाव कृती समितीचा मोर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अनुसूचित जाती आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय रद्द करण्यासाठी राहुरी तहसिल कार्यालयावर काल बुधवारी अनुसूचित जाती आरक्षण बचाव कृती समितीच्यावतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. राहुरी शहरातील राजवाडा येथून सकाळी हजारोच्या संख्येने आंबेडकरी समाज बांधव यानिमित्ताने एकवटलेला दिसून आला. मोर्चाच्या सुरुवातीला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास जमलेल्या सर्व मान्यवरांच्या वतीनेअभिवादन करण्यात आले.



यावेळी जमलेल्या सर्व समाज बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करत राहुरी शहरातून तहसील कार्यालयावर नेण्यात आला तहसीलच्या आवारात मोर्चा गेल्यानंतर त्याचे भव्य सभेत रूपांतर झाले. त्यावेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला जमलेल्या सर्वांनी अभिवादन करून सभेला सुरुवात झाली. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार राज्य सरकारांना अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सदर निर्णयामुळे अनुसूचित जातीमधील एकतेला बाधा पोहोचून सामाजिक दुरावा निर्माण होण्याची भीती असून राज्य सरकारने अनुसूचित जाती प्रवर्गात कोणतेही उपवर्गीकरण करू नये व एकसंध असलेल्या समाजात फुट पाडू नये. न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल त्वरित प्रकाशित करावा, केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध पुनर्विचार याचिका दाखल करावी किंवा संसदेत कायद्याने संरक्षण द्यावे. पदोन्नतीमधील आरक्षण तत्काळ लागू करावे व अनु. जाती-जमातीतील मागील अनुशेष भरून काढावा व सर्व अनुसूचित जातींची जातनिहाय जनगणना करूनच पुढील धोरण निश्चित करावे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. याप्रसंगी मोर्चामध्ये अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणात प्रशासनाला इशारा दिला आहे.पुढचे पाऊल आमचे अहिल्यानगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेणार असून त्याची दखल न घेतल्यास मुंबई येथे मोर्चा धडकणार असून वेळ पडली तर दिल्लीला जंतर-मंतर मैदानावर आम्ही जाऊन सरकारकडे न्याय मागणार असल्याचे म्हटले आहे.

त्यामुळे सरकारने या मोर्चाची दखल घ्यावी. अन्यथा रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत हा भीमसैनिक लढत राहणार असल्याचे आंदोलकांनी म्हटले आहे. या मोर्चामध्ये विशेष म्हणजे महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती. हजारोंच्या संख्येने समाजबांधव भर उन्हात राहुरी शहरातून तहसील कार्यालयाकडे घोषणा देत जाताना दिसत होते.

शेवटी अनेक तरुणींच्या हाताने प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी तहसील कार्यालयातील पटांगण भरगच्च गर्दीने फुलून गेले होते. मोर्चात आरपीआय जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात,तालुकाध्यक्ष विलास नाना साळवे, प्रविण लोखंडे,सुभाष त्रिभुवन, वंचित बहुजन आघाडीचे पिंटू नाना साळवे, बाळासाहेब जाधव, बाळासाहेब गायकवाड, सचिन साळवे, विरोधी पक्षनेते अरुण साळवे, भाऊसाहेब पगारे, राजन ब्राम्हणे, सुनिता थोरात,सीमा बोरुडे , स्नेहल सांगळे, यमुना भालेराव, स्नेहल दिवे, सुनील चांदणे यांच्यासह हजारोच्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत

### श्रीरामपूरचे खेळाडू प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्र

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : मुंबई येथील महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या वतीने वरळी येथील एमआरए शूटिंग रेंजमध्ये ३ जून ते ९ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या २९ व्या कॅप्टन एस. जे. इझेकियल स्मृती महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा - २०२६ मध्ये श्रीरामपूरच्या द अल्टिमेट स्पोर्ट शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत आगामी प्री-नॅशनल नेमबाजी स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे. या प्रतिष्ठित राज्यस्तरीय स्पर्धेत अकॅडमीच्या खेळाडूंनी विविध गटांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध केली.




१० मीटर रायफल प्रकारात आर्या राऊत हिने सब युथ, युथ आणि ज्युनिअर गटातून प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तसेच विराज शित्रे याने सब युथ व युथ गटात, तर प्रणव अघाव याने सब युथ गटात पात्रता संपादन केली.१० मीटर पिस्तूल प्रकारात हित बाठीया याने दमदार कामगिरी करत सब युथ, युथ, ज्युनिअर आणि सिनिअर अशा चारही गटांमधून आगामी प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवून विशेष यश संपादन केले.

विशेष म्हणजे,यापूर्वी मार्च २०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेतही अकॅडमीच्या चार खेळाडूंनी प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. त्यामुळे आतापर्यंत अकॅडमीच्या एकूण आठ खेळाडूंनी प्री-नॅशनल स्पर्धेत स्थान निश्चित केले असून, ही श्रीरामपूरच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. या सर्व खेळाडूंना द अल्टिमेट स्पोर्ट शूटिंग अकॅडमी, श्रीरामपूरचे प्रशिक्षक केतन विजय वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.

राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असलेल्या केतन वाघ यांच्या प्रशिक्षणाखाली अकॅडमीतील खेळाडू सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत असून राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवत आहेत.खेळाडूंच्या या यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत असून आगामी प्री-नॅशनल स्पर्धेतही ते उत्कृष्ट कामगिरी करून श्रीरामपूर व महाराष्ट्राचे नाव देशपातळीवर उंचावतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## विधान परिषदेवर बिनविरोध आलेल्या प्राजक्त तनपुरेंचा मुख्यमंत्र्यांनी केला सत्कार

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर विधान परिषदेच्या झालेल्या नाट्यमय घडामोडीनंतर माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाली या निवडीमुळे जिल्ह्यातील राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विशेष म्हणजे ३० मे रोजी प्राजक्त तनपुरे यांनी भाजपात प्रवेश घेतला आणि ३१ मे रोजी लगेचच त्यांना भाजपा पक्षाकडून अहिल्यानगर विधान परिषदेची उमेदवारी देण्यात आली. उमेदवारी दिल्यानंतर ४ जून रोजी विधान परिषदेची अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत होती, त्यावेळी सर्वच अपक्षांनी अर्ज मागे घेतले व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. या सर्व नाट्यमय घडामोडींच्या पाठीमागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजी खा. सुजय विखे आणि संग्राम जगताप यांनी सर्व सूत्रे हलवून प्राजक्त तनपुरे यांना आमदार केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राजक्त तनपुरे यांचे केलेले कौतुक त्यांच्या पाठीमागे उभे केलेली राजकीय शक्ती त्याचबरोबर राधाकृष्ण विखे यांची विखे फॅक्टरची ताकद हे या निवडणुकीतील सत्य सर्वकाही सांगून जात आहे. त्यातच प्राजक्त तनपुरे यांच्या नागरी सत्कार समारंभाच्या निमित्ताने राधाकृष्ण विखे यांनी सत्कार समारंभात प्राजक्त तनपुरे यांना आश्वासन देताना सांगितले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगून राज्य शासनाची संपूर्ण ताकद तुमच्या मागे उभी करू असे वक्तव्य केले. त्यामुळे जिल्ह्यातील सुशिक्षित व अभ्यासू नेतृत्वाच्या रूपाने प्राजक्त तनपुरे यांना पुन्हा मंत्रीपदाची संधी मिळणार अशी शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तविण्यात येत आहे. नुकतीच मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, नवनिर्वाचित विधानपरिषद आ. प्राजक्त तनपुरे, माजी खा. सुजय विखे यांनी मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी घेतलेल्या भेटीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेसाठी बिनविरोध निवडून आलेल्या अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले प्राजक्त तनपुरे यांचा स्नेहसन्मान करून त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या भेटीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

## विज्ञानाच्या वाटेवर जि प प्रवरानगरची भरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : प्रवरानगर येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पुन्हा एकदा शाळेचा व गावाचा नावलौकिक वाढवला आहे. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी जिद्द, नियमित अभ्यास व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर उत्कृष्ट प्राविण्य संपादन करत तालुका गुणवत्ता यादीत तब्बल सहा विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले आहे. यामध्ये आदर्श अंबादास उनवणे व शिवानी राहुल थेटे यांनी ८२% गुण मिळवून संयुक्तपणे २ रा क्रमांक, आदित्य किरण वाघमारे व अल्फेज जुबेर शेख यांनी ८०% गुण मिळवून संयुक्तपणे ३ रा क्रमांक, मनिष महादेव कानडे याने ७६% गुण मिळवून ४ था क्रमांक तर अनुराग सुरेश डोंगरे याने ६८% गुण मिळवून तालुक्यात ५ वा क्रमांक पटकावला असून गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या या ६ विद्यार्थ्यांची सायन्स वर्कशॉप तसेच इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे. याशिवाय अलविरा अकिल बेग व दिया गुलाब बेग यांनीही परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण होत शाळेच्या यशात भर घातली. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक फटांगरे तसेच वर्गशिक्षिका मनिषा गावडे, महादेव कानडे व मनिषा सपकाळे या शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विशेषतः इयत्ता पाचवीच्या वर्गाची जादा तासिका घेऊन शिक्षकांनी विविध स्पर्धा परीक्षांची विशेष तयारी करून घेतल्याने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत १ विद्यार्थ्याची तर सैनिकी शाळा प्रवेश परीक्षेत ६ विद्यार्थ्यांची निवड झाली असून शिष्यवृत्ती परीक्षेत तब्बल २६ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळवत शाळेची अभिमानास्पद ओळख निर्माण केली आहे. शाळेच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी विशेष अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे जि. प. मार्फत राबविला जाणाऱ्या 'मिशन आरंभ' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या नियमित सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास मोठी मदत झाली. या यशामध्ये राहाता तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अभयकुमार वाव्हळ, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी राजेश पावसे यांचे प्रेरणादायी प्रोत्साहन, तसेच शिक्षण विस्तार अधिकारी कांबळे, केंद्रप्रमुख कोळेकर यांचे शैक्षणिक मार्गदर्शन मोलाचे ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे प्रवरानगरच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक अधिक उंचावला असून विज्ञानविषयक शिक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## संगमनेर तालुक्यात ४० विशेष शिबिरांतून ६ हजार लाभार्थ्यांना स्मार्ट कार्डचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ सुलभ आणि जलद पद्धतीने मिळावा यासाठी संगमनेर बसस्थानक आगार प्रशासनाच्या व आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून तालुक्यातील विविध भागांमध्ये तब्बल ४० विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांद्वारे सुमारे ६ हजार लाभार्थ्यांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्य शासनाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ घेण्यासाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य असल्याने अनेक नागरिकांना बसस्थानकात वारंवार जावे लागत होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व्यक्ती तसेच दुर्गम ग्रामीण भागातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी गावागावांत जाऊन विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली. त्यामुळे लाभार्थ्यांना स्वतःच्या गावातच नोंदणी, कागदपत्र पडताळणी आणि स्मार्ट कार्ड वितरणाची सुविधा उपलब्ध झाली.



या शिबिरांमध्ये लाभार्थ्यांची नोंदणी, आवश्यक कागदपत्रांची तपासणी तसेच स्मार्ट कार्ड वाटपाची प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पार पडली. आगार प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध कामकाजामुळे अल्पावधीत मोठ्या संख्येने नागरिकांपर्यंत ही सेवा पोहोचविणे शक्य झाले. परिणामी, तालुक्यातील हजारो नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे.

या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून ग्रामीण भागातील नागरिकांनी गावपातळीवरच सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार अमोल खताळ आणि संगमनेर आगार प्रशासनाचे आभार मानले आहेत. नागरिकांमधून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने प्रशासनालाही मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

### लोकाभिमुख उपक्रमांना प्राधान्य...

नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळविताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी भविष्यातही अशाच लोकाभिमुख उपक्रमांना प्राधान्य दिले जाणार आहे. शासनाच्या सेवा आणि सुविधा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू राहील. स्मार्ट कार्ड वितरण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे संगमनेर तालुक्यातील हजारो कुटुंबांसाठी एसटीच्या प्रवासी सवलत योजनांचे दरवाजे अधिक व्यापकपणे खुले झाले असून, ग्रामीण भागात प्रशासनाविषयीचा विश्वासही अधिक दृढ झाला आहे. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला दिलासा देणारा हा उपक्रम तालुक्यासाठी एक महत्त्वाचा आदर्श ठरत आहे.

**अमोल खताळ (आमदार)**

# लंडनहुन वारी निघाली पंढरीला...

## ४२ दिवसांची ग्लोबलवारी १८ जुलैला पंढरपूरात होणार दाखल

**गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त महाराजांना मानवंदना अर्पण करत महाराष्ट्राची संस्कृती, वारकरी परंपरा आणि ढोल-ताशा संस्कृती जागतिक स्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर (डतठढ), युनायटेड किंगडम यांच्या वतीने ६ जून रोजी विंडसर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'वाद्य महोत्सव २०२६' ला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या भव्य आयोजनाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडन यांनी दखल घेत महोत्सवाला जागतिक विक्रमाचा बहुमान प्रदान केला.

रॉयल विंडसर रेसकोर्स येथे प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात यूकेसह



विविध देशांतील १३ ढोल-ताशा पथके आणि २५० हून अधिक ढोलवादक सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या दणदणाटात छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना अर्पण करण्यात आली.

यावेळी युरोप, यूके आणि अन्य देशांतील ३ हजारांहून अधिक भाविक, शिवप्रेमी आणि मराठी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमास ह.भ.प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री (भगवानगड) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणाऱ्या या सोहळ्याने उपस्थितांना भारावून टाकले. याच दिवशी जगातील पहिल्या 'ग्लोबल वारी - लंडन ते पंढरपूर' या अनोख्या आध्यात्मिक यात्रेचाही शुभारंभ करण्यात आला.

६ जून रोजी लंडनमधून निघालेली ही वारी १८ जुलै रोजी पंढरपूर येथे विठ्ठल चरणी पोहोचणार आहे. ४२ दिवसांच्या या यात्रेत यूके, नेदरलँड्स, बेल्जियम, फ्रान्स, लक्झेंबर्ग, जर्मनी, पोलंड, झेक रिपब्लिक, हंगेरी, तुर्की आणि जॉर्जिया असा प्रवास करण्यात येणार आहे. जॉर्जियाहून मुंबईपर्यंत हवाई मार्गाने आगमन झाल्यानंतर आळंदी ते पंढरपूर हा पारंपरिक पायी वारीचा टप्पा पूर्ण केला जाणार आहे. ८ जूनपर्यंत या वारीने नेदरलँड्समध्ये प्रवेश केला असून युरोपभरातून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विठ्ठल भक्ती, संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाचा संदेश जगभर पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या माध्यमातून होत आहे. अशी माहिती लंडनमध्ये नोकरी निमित्त स्तिथ असलेले व मूळ कोल्हार बुद्रुक येथील रहिवाशी अभियंता ऋषिकेश गाढे यांनी दिली. गाढे यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

वाद्य महोत्सव २०२६ आणि ग्लोबल वारी २०२६ यांच्या यशस्वी आयोजनात योगदान दिले आहे. दरम्यान, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर (डतठढ), यूके यांच्या वतीने आगामी आषाढी एकादशी महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून त्याची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. जगभरातील वारकरी, भाविक आणि मराठी बांधव या सोहळ्याकडे उत्सुकतेने पाहत आहेत.

**जाहीर नोटीस**

श्रीरामपूर येथील मे. उपविभाय अधिकारी साहेब, भाग श्रीरामपूर यांचे न्यालयातील

आरटीएस अपील अर्ज क्रमांक १३८/२०२६

१. एंड्र्यु हेनरी जॉन ---अर्जदार
२. पिटर हेनरी जॉन---- अर्जदार
३. लुकस हेनरी जॉन---अर्जदार
४. जुलीयाना हेनरी जॉन --- अर्जदार विरुध्द
१. मंडळ अधिकारी बांरागाव नांदुर--- प्रतिवादी

प्रति,

अर्जदार १. एंड्र्यु हेनरी जॉन रा. पंचम सोसाटी बिल्डींग नं. फ्लॅट नं. १८ सावरकरनगर, गंगापुर रोड, नाशिक २. पिटर हेनरी जॉन ३. लुकस हेनरी जॉन ४. जुलीयाना हेनरी जॉन कुलभुषण सोसायटी, फ्लॅट नं.४ उदयनगर, लेन नं.२, गंगापुर रोड, नाशिक यांनी मौजे गडध आखाडा ता. राहुरी येथील गट नं. ३०/१, ३०/२, ३३ व ४५ या मिळकती वरील वारस फेरफार क्र. १५३६ बाबत इकडेस अपील दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी वादी यांनी फक्त मंडळ अधिकारी बारागाव नांदुर यांना प्रतिवादी केलेले आहे. तरी संबधीत वाद मिळकतीबाबत इतर व्यक्तींचा वारसा बाबत हक्क संपादीत करीत असल्यास त्यांनी हि प्रसिध्द केलेल्या नोटीसी मध्ये नमुद तारखेस व वेळेस उपस्थीत राहुन आपली हरकत नोंदवावी.

त्याअर्थी आपणास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आपण नोटीस प्रसिध्द झाल्या पासून नेमलेल्या तारखेपुर्वी म्हणजे दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० व. उपविभागीय कार्यालय श्रीरामपूर येथे आपण स्वतः अगर आपले वकीलामार्फत हजर होवुन आपले म्हणणे दयावे. आपण हजर न राहील्यास प्रकरणाची एकतर्फे सुनावणी घेवून पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी दिली आहे.

शिक्का

**उपविभागीय अधिकारी**
**श्रीरामपूर भाग श्रीरामपूर**

# वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू, आठ जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरात तीन वेगवेगळ्या घडलेल्या अपघातात तिघांचा मृत्यू तर आठ जण जखमी

झाल्याची घटना मंगळवारी (ता.९) रोजी रात्री ७.३० ते ८.३० वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान एकाच वेळी या तिन्ही अपघातातील जखमींना उपजिल्हा रुग्णालयात एकाच वेळेस दाखल करण्यात आल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांची धावपळ झाली.यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांसह,कर्मचारी,सुरक्षा रक्षक व स्थानिक नागरिक यांनी जखमींना वेळेत उपचार देण्यासाठी मदतकार्य केले.

पहिल्या घटनेत भरधाव रिक्षा पलटी होऊन घडलेल्या अपघातात एका मुलीचा मृत्यू तर ४ जण जखमी झाल्याची घटना मंगळवार ता. ९ रोजी छत्रपती संभाजीनगर नाशिक राष्ट्रीय महामार्गावर कोल्ही घाटात रात्री ८ ते साडेआठ वाजेच्या सुमारास घडली. अश्विनी सिद्धार्थ अभंग (वय १८ वर्षे रा. सासेगाव तालुका कन्नड) हल्ली मुक्काम जाधववाडी छत्र.संभाजीनगर असे घटनेतील मयत मुलीचे नाव आहे तर या अपघातात दीक्षा रेवत शिरसाट (वय ३३ रा. चिकलठाणा), पूनम राजू जाधव (वय २५ वर्षे रा. छत्रपती संभाजीनगर), शिल्पा संकेत साळवे (वय ३२ वर्षे रा. धोंदलगाव), ऋषिकेश सिद्धार्थ अभंग (वय २५ वर्षे रा. छत्रपती संभाजीनगर) हे जखमीं झाले आहे. याबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार शिऊरच्या दिशेने जाणाऱ्या रिक्षाचे नियंत्रण सुटून कोल्ही घाटात रिक्षाचा अपघात झाला. अपघातात जखमींना स्थानिकांनी मदतकार्य करत तातडीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी यांनी अश्विनी हिला तपासून मृत घोषित केले तर अन्य तिघा जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

दुसऱ्या घटनेत मंगळवारी सायंकाळी ८ ते ८.३० वाजेच्या दरम्यान दोन दुचाकींची धडक होत घडलेल्या



अपघातात दोघांचा मृत्यू तर एक जण जखमी झाला.याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार प्रवीण सुरेश चव्हाण (वय ३२ वर्षे रा. कुंभार गल्ली वैजापूर) हे जुन्या नागपूर मुंबई महामार्गाने वैजापूरच्या दिशेने येत असताना समोरून लासूरच्या दिशेने दुचाकीवर येणाऱ्या विलास भिकाजी खावले (वय ३२ रा. नारेगाव) व राम अर्जुन भुमरे (वय २५ रा. पैठण) यांच्या दुचाकीसोबत शिवराई शिवारात धडक झाली.

जखमींना गोलवाडी, बेंदवाडी, शिवराई येथील नागरिकांनी मदतकार्य करत वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र विलास खावले व प्रवीण चव्हाण यांना वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषित केले. तर जखमी राम भुमरे यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.

तिसऱ्या घटनेत दुचाकीला कुत्रे आडवे आल्याने तिघे जखमी झाले. महालगाव जवळ मंगळवारी रात्री हा अपघात घडला. अपघात नेहा श्रीधर अहिरे, शोभा श्रीधर अहिरे, देवयानी श्रीधर अहिरे (वय ११ वर्षे रा. सिन्नर) हे जखमी झाले आहे. महालगाव जवळ दुचाकीने जात असताना कुत्रे आडवे आल्याने दुचाकी घसरून अपघात घडला. जखमींना रुग्णवाहिका चालक अमोल धीवर, सतीश जाधव यांनी मदतकार्य करत वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. अपघातात चिमुकली ही गंभीर जखमी झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

दरम्यान एकच वेळेस तीन अपघातातील जखमी उपजिल्हा रुग्णालयात आल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांची धावपळ झाली. यावेळी वैद्यकीय अधिकारी यांना सुरक्षा रक्षक,वैद्यकीय कर्मचारी, व स्थानिक नागरिकांनी मदतकार्य केले. घटनास्थळी आमदार रमेश बोरनारे,शैलेश चव्हाण, महेश बुणगे, ज्ञानेश्वर शिरसाट, विनोद राजपूत, राजेंद्र साळुंके, धीरज साळवे यांनी भेट दिली.

## पान १ वरुन

### पुरुषोत्तमपुरीत बोट बुडाली : दोन महिलांचा दुर्दैवी अंत

दाखल झाले. दुर्घटनेनंतर नदीकाठावर मोठी गर्दी झाली होती. मृतांच्या नातेवाईकांचा आक्रोश आणि जखमींच्या नातेवाईकांची धावपळ यामुळे संपूर्ण परिसर हळहळून गेला.

दरवर्षी अधिकमास यात्रेदरम्यान पुरुषोत्तमपुरी येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. नदी ओलांडण्यासाठी बोटींचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. मात्र यावेळी बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आल्याने सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. श्रद्धेच्या प्रवासात निष्काळजीपणाची किंमत दोन महिलांना जीव गमावून चुकवावी लागल्याची भावना भाविकांमधून व्यक्त होत आहे.

दोन महिलांचा मृत्यू, अनेक जखमी आणि थोडक्यात बचावलेले डझनावधी जीव यामुळे पुरुषोत्तमपुरीची यात्रा यंदा एका वेदनादायी आठवणीने कायमची स्मरणात राहणार आहे. श्रद्धा आणि सुरक्षेचा समतोल राखणे किती आवश्यक आहे, याची जाणीव या दुर्घटनेने पुन्हा एकदा करून दिली आहे.

### तिघांकडून बॉन्डचे उल्लंघन, ९० हजारांची रक्कम वसुल

शनिशिंगणापूर( ता.नेवासा ) स्टेशन अंतर्गत येणाऱ्या रस्तापूर येथील नितिन मोहन राशिनकर यांच्याकडून ५० हजार, अक्षय रामदास चेमटे (रा. घोडेगाव ), यांच्याकडून ३० हजार (सोनई पोलीस स्टेशन हद्दीतील ) आणि फिरोज नवाब शेख ( रा. शेडगाव ता संगमनेर, आश्वी पोलीस स्टेशन हद्दीतील) यांच्याकडून १० हजारांची बॉन्डची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

### १२ वर्षांच्या कार्यकाळाला पूर्णविराम नाही...

कारभारात अडकला. २०१४ मध्ये एनडीए सत्तेवर आल्यानंतर देशाच्या विकासाला नवी गती मिळाली, असे ते म्हणाले.

सुशासन, स्पष्ट धोरण, प्रामाणिक हेतू आणि निर्णयक्षमता यांच्या जोरावर देशाने विकासाची नवी वाटचाल अनुभवली असून आगामी काळातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी एनडीए कटिबद्ध राहील, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला.

### पंडित नेहरुंचा विक्रम आज नरेंद्र मोदींच्या नावावर

भूषवलं. जवाहरलाल नेहरूंनी १९५२ च्या पहिल्या निवडणुकीनंतर सुमारे ४३९८ दिवस पंतप्रधान म्हणून काम केलं, नरेंद्र मोदी १० जून २०२६ रोजी हा विक्रम मोडतील.नेहरूप्रमाणे मोदी देखील लोकप्रिय मतदारांच्या पाठिंब्यावर सलग अनेक वर्षे देशाचे नेतृत्व करत आहेत.मोदी सरकारने डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया आणि इन्फ्रास्ट्रक्चर विकासावर विशेष भर दिला आहे.सलग निवडून येण्याचा हा विक्रम मोदींच्या लोकप्रियता आणि विकासाच्या राजकारणाचा पुरावा ठरले आहे.नेहरूंनंतर एवढ्या दीर्घ कालावधीत सलग पंतप्रधानपद भूषवणारे मोदी हे पहिले नेते ठरतील.

## वाशिमच्या आदिवासी कुटुंबाचे भाजपा कार्यकर्त्यांकडून सांत्वन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील टोका गावाजवळील वाशिम येथे काही आदिवासी कुटुंब राहत आहेत. वादळामुळे घराची भिंत व छत कोसळून बबाई शिंदे यांचे दुःखद निधन झाले. या आदिवासी कुटुंबाचे भाजपा कार्यकर्त्यांकडून सांत्वन करण्यात आले. या भागात वादळी वाऱ्यासह अचानक पाऊस आला तथापी पाऊस थोडा परंतु वादळ फार मोठे झाले. त्यामुळे घराचे छत व भिंत कोसळली व अत्यंत गरीब आदिवासी कुटुंबावर हा फार मोठा आघात झाला. त्यांच्या कुटुंबात चार मुली एक मुलगा जावई व नातवंड असा मोठा परिवार आहे. सदर घटने संदर्भात दुःखाचे सांत्वन करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष प्रताप राजे चिंधे यांनी भेट दिली. याप्रसंगी डॉ अशोक ढगे, सामाजिक कार्यकर्ते गजानन गवारे, गंगाधर रासने, बाबासाहेब गोत्राणे गणेश काळे व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते चिंधे यांनी तातडीने तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्याशी संपर्क साधला तेव्हा तहसीलदार यांनी तातडीने कार्यवाही होणार असल्याचे सांगितले.



## रंगूनवाला डेंटल कॉलेजमध्ये अत्याधुनिक सिम्युलेशन लॅबचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे अत्याधुनिक प्री-क्लिनिकल सिम्युलेशन लॅबोरेटरीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बदलत्या आरोग्य क्षेत्राच्या गरजांनुसार सक्षम व तंत्रज्ञानस्नेही आरोग्य व्यावसायिक घडविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

कार्यक्रमात बोलताना मंत्री मुश्रीफ यांनी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, जनजागृती आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत वैद्यकीय शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. भविष्यातील डॉक्टरांसाठी केवळ उपचार कौशल्य नव्हे, तर अचूक निदान व योग्य निर्णयक्षमता अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य तथा कन्झर्व्हेटिव्ह डेंटिस्ट्री व एंडोडॉन्टिक्स विभागप्रमुख डॉ. विवेक हेगडे यांनी सीबीसीटीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना शरीररचना, आजारांचे निदान आणि उपचार नियोजनाची सखोल समज विकसित करण्यास मदत होत असल्याचे नमूद केले. वरिष्ठ ओरल अँड मॅक्सिलोफेशियल सर्जन डॉ. जनार्दन गार्डे यांनी आधुनिक आरोग्यसेवेत अचूक निदान व पूर्वनियोजन हे यशस्वी उपचारांचे प्रमुख आधार असल्याचे सांगितले.

दंतवैद्यकीय संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. मोहित खेवूर यांनी तंत्रज्ञानासोबत वैज्ञानिक विचार व पुराव्यावर आधारित निर्णयक्षमतेचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

महाविद्यालयात सुरू करण्यात आलेली सीबीसीटी सुविधा, नवीन सिम्युलेशन लॅबोरेटरी आणि प्रस्तावित डिजिटल डेंटिस्ट्री उपक्रम यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक आरोग्यसेवेच्या गरजांनुसार प्रशिक्षण मिळणार आहे. या माध्यमातून भविष्यातील तज्ज्ञ डॉक्टर घडविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आल्याचे मानले जात आहे.



CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME SHAIKH NAZIM SHAIKH 'NAZIR (NAME AS PER OLD PASSPORT NO.H7040458) TO NEW NAME AS NAJIM NAZIR SHAIKH (VIDE AADHAR NO.5355 9263 8293)

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME BUSHRA ABDUL JABBAR SHAIKH (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS) AND BUSHRA A JABBAR SHAIKH (NAME AS PER SCHOOL LEAVING CERTIFICATE) TO NEW NAME AS BUSHARA KASAM BEG VIDE AADHAR NO.4197 4144 7336

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपातर्फे वृक्षारोपण



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पालघर, :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, पालघर शहर मंडळाच्या वतीने गणेशकुंड, पालघर पश्चिम येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारची रोपे लावून हरित उपक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम भाजपा पालघर जिल्हा कामगार आघाडीचे अध्यक्ष अरुण अनंत माने यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नंदन वर्तक, पालघर शहर मंडळाचे अध्यक्ष ॲड. जयेश आव्हाड, युवा अध्यक्ष भावेश जैन तसेच महिला मोर्चा अध्यक्षा सविता मल्लाह, अंजली ललवाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक गणेश कुडू तसेच सहसंयोजक हेमंत पाटील आणि माधव सोमवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्ती प्रमुख, बूथ प्रमुख आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असून वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व उपस्थितांचे आयोजकांनी आभार मानले.

## सोनेवाडीत दशावतारी खेळ, आखाडी उत्सवाला सुरुवात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी येथे गेल्या अनेक वर्षाची परंपरा जोपासली जात आहे. नगदवाडी व सोनेवाडी ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने दशावतारी खेळ, आखाडी उत्सवाला मंगळवार दि. ९ जून रोजी सुरुवात झाली आहे. आठ सुरू असणारा हा दशावतारी खेळ नरसिंह , नरसा अवताराने हिरण्यकश्यपू वध करून या खेळाची सांगता होणार आहे.

रशीक प्रेषक व नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद या आखाडीला मिळतो आहे. संगीता महाडिक पुणेकर यांच्या तमाशाने ग्रामस्थांचे मनोरंजन होत आहे.

दौलत दादा मेहेरबान सलाम, बाजूचे बाजू, कदम से कदम , श्री गजानन महाराजांची स्वारी येत आहे निघा रखो महाराज.. मन्हत भालदार चोपदारांनी सूत्रधाराला संदेश दिला. आणि आखाडीला सुरुवात झाली.

वदूषक आणि सूत्रधाराच्या संवादाने उपस्थितांचे मने जिंकून घेतली. दशावतारी खेळ ही कोकणची प्राचीन लोककला असून सोनेवाडीकरांनी ही परंपरा आजही जिवंत ठेवली आहे. मत्स्य, कूर्म, वराह ते राम, कृष्ण, कल्कि अशा श्री विष्णूच्या दहाही अवतारांचे सादरीकरण यावेळी केले जाणार आहे. आकर्षक वेशभूषा, पारंपरिक मुखवटे आणि भारदस्त संवादांनी सजलेला हा खेळ पाहण्यासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.

## निधन वार्ता

### श्रीकांत रासकर



**शिरसगाव :** येथील प्रगत शेतकरी श्रीकांत दौलत रासकर (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचे मागे पत्नी एक मुलगा,नातवंडे असा परिवार आहे.शिरीष रासकर यांचे ते वडील होत.

### सचिन कदम



**शिरसगाव** उंदीरगाव येथील जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापक सचिन कदम (वय ४४) यांचे अल्पशा आजाराने निदान झाले. त्यांचे मागे पत्नी एक मुलगा असा परिवार आहे.संत तेरेजा क्लबचे डी एस गायकवाड यांचे ते जावई व रे फा .मॅथ्यू येवले यांचे ते भाचे होत.

### पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्याने दाखल केलेल्या

## फौजदारी गुन्ह्यात तब्बल सात वर्षांनी शेतकरी निर्दोष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्याने दाखल केलेल्या फौजदारी गुन्ह्यात तब्बल सात वर्षांच्या न्यायालयीन लढाईनंतर शेतकरी अंबादास साहेबराव शिरसाठ व राजेंद्र भीमराज गव्हाणे यांची अखेर निर्दोष मुक्तता झाली. नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ख-१७६/२०१९ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३, ३३२, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सन २०१९ मध्ये शेतातील पाटाच्या पाण्याच्या वादातून हा गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादी हे पाटबंधारे विभागात कार्यरत कर्मचारी असून शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याचा आरोप आरोपींवर ठेवण्यात आला होता. त्यानुसार नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन प्रकरण न्यायालयात गेले. गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना अटक करण्यात आली होती. शेतीसाठी पाणी मिळविण्याच्या प्रश्नातून निर्माण झालेल्या या प्रकरणात त्यांना काही काळ कारागृहातही राहावे लागले होते. त्यानंतर न्यायालयाने प्रकरणातील परिस्थितीचा विचार करून आरोपींना जामीन मंजूर केला होता. या कालावधीत संबंधित शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना मोठ्या मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रासाला सामोरे जावे लागले.

शेतकरी अंबादास साहेबराव शिरसाठ व राजेंद्र भीमराज गव्हाणे यांच्या विरोधात सदर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या काळातील राजकीय परिस्थितीमुळे या प्रकरणाची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली होती. विविध स्तरांवर आरोप-प्रत्यारोप झाले, वातावरण तापले आणि प्रकरणाला राजकीय रंगही प्राप्त झाला. मात्र या सर्व घडामोडींमध्ये प्रत्यक्ष त्रास हा संबंधित शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांनाच सहन करावा लागला. न्यायालयीन लढाई, अटक, जामीन प्रक्रिया तसेच सामाजिक व आर्थिक परिणामांचा सामना करत त्यांनी तब्बल सात वर्षे संघर्ष केला.

> शेतकऱ्यांना व्यवस्थेने नाकारले; न्यायालयाने न्याय दिला ''शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल होणे आणि त्यांना कारागृहात जावे लागणे ही दुर्दैवी बाब आहे. या प्रकरणातील शेतकऱ्यांना तब्बल सात वर्षे न्यायालयीन लढा द्यावा लागला. तत्कालीन परिस्थितीत वातावरण तापले, मात्र त्याचा सर्वाधिक त्रास शेतकऱ्यांनाच सहन करावा लागला. अखेर मा. न्यायालयाने पुराव्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून त्यांना न्याय दिला. हा निकाल न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा आहे.''
>
> **ॲड. पांडुरंग औताडे**
> **विधिज्ञ तथा युवक जिल्हाध्यक्ष,**
> **प्रहार जनशक्ती पक्ष, अहिल्यानगर**



सदर प्रकरणाची सुनावणी नेवासा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री वाघमारे साहेब यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीदरम्यान फिर्यादी, साक्षीदारांचे जबाब तसेच अभियोजन पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांचे सखोल परीक्षण करण्यात आले. मात्र आरोपींविरुद्धचे आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले ठोस व विश्वासार्ह पुरावे सादर करण्यात अभियोजन पक्षाला अपयश आले.

साक्षीदारांच्या जबाबांतील विसंगती, घटनाक्रमातील त्रुटी तसेच उपलब्ध पुराव्यांचा विचार करता आरोपींविरुद्धचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यानंतर मा. वाघमारे साहेब यांनी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता करत महत्त्वपूर्ण निकाल दिला.

या प्रकरणात आरोपी नंबर १ च्या वतीने विधिज्ञ पांडुरंग औताडे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. कमलेश नवले यांनी सहाय्य केले. तर आरोपी क्रमांक २ च्या वतीने विधिज्ञ एन. एस. जोशी यांनी कामकाज पाहिले. बचाव पक्षाने मांडलेल्या मुद्द्यांचा, सादर केलेल्या पुराव्यांचा तसेच न्यायालयीन निर्णयांचा विचार करून न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा आदेश दिला.

तब्बल सात वर्षे न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागलेल्या शेतकरी कुटुंबाला या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला असून, परिसरातून न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि . ११ जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>६६० | २-३ | १२०<br>४९०<br>४४५ | जोड<br>२०-७३-६४-९५-३१ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| २४०<br>२६८<br>२२२ | ०-४ | १६०<br>२५०<br>७०० | जोड<br>६९-०७-२१-४८-७९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-६ | १५०<br>१६९<br>६०० | जोड<br>५९-१६-३२-८०-६४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | 2 1 | 8 5 | 8 2 | 1 3 | 1 |
| To | 316 | 4 6 56 | 8 7 05 | 8443 | 43 09 | 3 |
| 13/03/2026 | 6 | 0 8 | 0 8 | 98 | 84 | 5 |
| 16/03/2026 | 4 | 8 2 | 3 4 | 41 | 16 | 3 |
| to | 556 | 9 0 21 | 8 6 02 | 9202 | 37 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | 9 0 | 0 0 | 97 | 80 | 8 |
| 23/03/2026 | 6 | 3 4 | 1 5 | 71 | 23 | 1 |
| to | 834 | 5 5 46 | 7 6 03 | 8346 | 4364 | 6 |
| 27/03/2026 | 9 | 6 5 | 8 9 | 80 | 00 | 7 |
| 30/03/2026 | 2 | 1 1 | 1 2 | 11 | 11 | 2 |
| to | 890 | 3 3 87 | 6 7 97 | 1112 | 56 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | 6 4 | 0 0 | 99 | 69 | 9 |
| 06/04/2026 | 1 | 2 1 | 7 1 | 43 | 11 | 4 |
| to | 370 | 2 4 02 | 7 3 98 | 7582 | 5278 | 6 |
| 10/04/2026 | 3 | 6 5 | 8 5 | 70 | 64 | 8 |
| 13/04/2026 | 5 | 1 1 | 6 2 | 51 | 82 | 1 |
| to | 606 | 5 4 43 | 7 3 45 | 03 77 | 9685 | 4 |
| 17/04/2026 | 9 | 0 9 | 0 9 | 03 | 00 | 0 |
| 20/04/2026 | 5 | 1 8 | 4 1 | 35 | 33 | 3 |
| to | 700 | 2 8 58 | 5 2 53 | 5571 | 8468 | 7 |
| 24/04/2026 | 8 | 7 9 | 9 2 | 57 | 09 | 8 |
| 27/04/2026 | 3 | 1 4 | 7 1 | 16 | 16 | 2 |
| to | 563 | 2 4 85 | 8 6 71 | 2729 | 98 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | 0 0 | 0 0 | 89 | 98 | 0 |
| 04/05/2026 | 1 | 3 1 | 6 2 | 22 | 22 | 2 |
| to | 771 | 9 4 34 | 8 3 48 | 7425 | 54 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | 9 8 | 0 9 | 96 | 80 | 9 |
| 11/05/2026 | 5 | 2 3 | 2 6 | 21 | 14 | 1 |
| to | 679 | 7 7 04 | 3 0 68 | 3901 | 2785 | 5 |
| 15/05/2026 | 6 | 0 0 | 9 0 | 30 | 87 | 9 |
| 18/05/2026 | 8 | 4 5 | 1 1 | 17 | 42 | 2 |
| to | 979 | 5 6 96 | 7 4 22 | 2830 | 8893 | 5 |
| 22/05/2026 | 0 | 0 8 | 8 7 | 98 | 89 | 6 |
| 25/05/2026 | 5 | 2 3 | 1 8 | 41 | 24 | 5 |
| to | 611 | 9 4 37 | 3 9 78 | 69 05 | 5606 | 5 |
| 29/05/2026 | 0 | 0 6 | 3 0 | 80 | 80 | 6 |
| 01/06/2026 | 4 | 1 9 | 1 2 | 51 | | |
| to | 489 | 3 9 80 | 2 6 82 | 721 | | |
| 05/06/2026 | 0 | 5 0 | 7 0 | 08 | | |

# सर्जेपुरा रोडवरील अतिक्रमणांवर ‘हातोडा’

## आधी हिरवे अतिक्रमण काढा, मग आम्ही आमची काढू : आ. जगताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि डीपी रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्णत्वास नेण्यासाठी महानगरपालिकेकडून सर्जे पुरा रोडवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या कारवाईची आमदार संग्राम जगताप यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला विविध सूचना दिल्या. यावेळी त्यांनी अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



राज्य शासनाकडून शहरातील डीपी रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून आणण्यात आला असून गेल्या एक वर्षापासून विविध रस्त्यांची काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांमध्ये अडथळा ठरणारी अनेक अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र या प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी दुहेरी निकष लावले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहराच्या विकासासाठी रस्ते रुंदीकरण आणि काँक्रिटीकरण अत्यंत आवश्यक आहे. अनेक नागरिकांनी विकासकामांना सहकार्य करत स्वतःहून आपली अतिक्रमणे आणि हिंदू धर्माशी संबंधित धार्मिक स्थळे मागे घेतली. शहराच्या विकासाला प्राधान्य देत त्यांनी मोठा त्याग केला. मात्र काही प्रवृत्तींकडून अतिक्रमणे कायम ठेवली जात आहेत आणि त्यावर कारवाई करण्यास प्रशासन धजावत नसल्याचे चित्र दिसत आहे.

ते पुढे म्हणाले की, अचानक रस्त्याच्या कडेला थडगी उभी करणे, त्यांना रंगरंगोटी करणे आणि त्याच्या आडून रस्त्यांमध्ये अतिक्रमण निर्माण करणे ही गंभीर बाब आहे. अशा अनधिकृत थडग्यांचे वाढते प्रमाण हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. विकासकामांसाठी जर हिंदू धर्माशी संबंधित धार्मिक स्थळांवर कारवाई केली जात असेल, तर इतर अनधिकृत अतिक्रमणांवरही समान निकष लावले गेले पाहिजेत. प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणांवर एकसमान कारवाई करावी.

आधी हिरवे अतिक्रमण काढा, मग आम्ही आमची काढून घेऊ, अशी भूमिका मांडत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला. हिंदूंना वेठीस धरण्याचे काम प्रशासनाने करू नये. विकासकामांच्या नावाखाली एकाच समाजावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे आणि त्याची अंमलबजावणीही तितक्याच निष्पक्षपणे झाली पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# द•ख•ल

## जिल्हा रुग्णालयाची रेकॉर्ड रूम फोडली अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल




**अहिल्यानगर :** जिल्हा रुग्णालयातील अत्यंत महत्त्वाची असलेली 'एमएलसी' रेकॉर्ड रूम अज्ञात चोरट्याने फोडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी रुग्णालयाचे कनिष्ठ लिपिक कैलास काशिनाथ शिंदे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोराच्या विरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कैलास शिंदे हे जिल्हा रुग्णालयाच्या एमएलसी विभागात काम करतात. रुग्णालयातील व्हिडिओ कॉन्फरन्स आणि सिटी स्कॅन रूमच्या जवळ असलेल्या खोली क्रमांक २८ मध्ये मागील १५ वर्षांचे न्यायालयीन व पोलीस केस संबंधित जुने रेकॉर्ड ठेवण्यात आलेले आहे. ५ जून रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे रेकॉर्ड रूम व्यवस्थित कुलूप लावून बंद करण्यात आली होती. त्यानंतर ९ जून रोजी सकाळी शिंदे हे जुने रेकॉर्ड पाहण्यासाठी गेले असता, दरवाजाला आतून कडी लावल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी पाठीमागच्या बाजूला जाऊन पाहिले असता रेकॉर्ड रूमची खिडकी उघडी होती आणि तिचे लोखंडी ग्रील गायब होते. खिडकीतून आत प्रवेश केला असता, खोलीतील सामान अस्ताव्यस्त पडले होते. चोरट्याने खोलीतून वर्ष २०२१ ते २०२२ दरम्यानचे 'एमएलसी ओपीडी क्ष-किरण' (एक्स-रे) विभागाचे बांधून ठेवलेले २४ महत्त्वाचे गठ्ठे आणि खिडकीचे लोखंडी ग्रील चोरून नेले. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आणि लबाडीच्या इराद्याने ही चोरी करण्यात आली आहे. पोलीस आता या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## शिवरायांच्या शौर्यपरंपरेचा वारसा जपणाऱ्या खेळाडूंचा सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे गौरव



**अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पमधील सहभागी खेळाडूंचा मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमास मान्यवर, पालक आणि खेळाडूंची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे दि. २० मे ते ५ जून २०२६ या कालावधीत श्री श्रमिक बालाजी मंदिर परिसर तसेच श्री मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा येथे एकाच वेळी समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी आणि मल्लखांब यांसारख्या भारतीय परंपरेचा अभिमान असलेल्या युद्धकला व क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती अकॅडमीच्या वर्षा म्याकल यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी आपल्या मनोगतातून खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आजचे विद्यार्थी हे उद्याचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत.


## साईबन मधील लालभडक गुलमोहर झाडाची रांग पर्यटकांना आकर्षण

**अहिल्यानगर :** गुलमोहर वृक्षाची असंख्य झाडे साईबनमध्ये असून हा फुललेला गुलमोहर येणाऱ्या लोकांचे आकर्षण ठरत आहे,गुलमोहर हा उष्ण प्रदेशात वाढणारा वृक्ष आहे.याला इंग्लिशमध्ये मे फ्लॉवर



ट्री असे नाव आहे.गुलमोहर हा वैशाखातल्या रणरणत्या उन्हातही फुलणारा वृक्ष आहे. हा वृक्ष बहरात नसतानाही इतर वृक्षांपेक्षा अधिक काळ हिरवाई टिकवतो. नगरमधील शिर्डी रोडवरील नागापूर एमआयडीसी च्या मागे असणार्या साईबन कृषी पर्यटन केंद्रात उन्हाळ्याची सुट्टी संपत आल्यामुळे अनेक जण सहकुटुंब व ग्रुपने येत आहे.त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे, निसर्गरम्य असणारे वातावरण तसेच झाडी व शुद्ध हवा यामुळे मन प्रसन्न राहते.येथे येणाऱ्या लोकांचे सध्या लालभडक गुलमोहर आकर्षण ठरत आहे. गुलमोहर हे झाड जगभरात निरनिराळ्या भौगोलिक परिस्थितीत बहरताना दिसत.समुद्रकिनारी असोत वा समुद्रसपाटीपासुन ह्जारो फूट उंचीपर्यंतचा डोंगराळ भाग असो तिथे दिसतो,लोकांचे निसर्ग आणि पर्यावरण रक्षण आणि संवर्धन यांकडे लक्ष वेधावे म्हणून आकर्षक अशा फुलांनी बहरलेला गुलमोहर प्रातिनिधिक वृक्ष समजला जातो,जमिनीकडे झेपावणाऱ्या फांद्यांमुळे गुलमोहराचा छत्रीसारखा घुमट तयार होतो. मे महिन्यात त्याला फुले येतात,गुलमोहोराच्या वैशिष्ट्यपूर्ण पाच लाल-केशरी पाकळ्यांवर पांढऱ्या-पिवळ्या रंगाच्या आकर्षक रेषा असतात अन् त्यामुळे या फुलाचे सौंदर्य अधिकच खुलते.

## एस.टी. बसस्थानक आवारात २०० मीटर नो पार्किंग झोन ची कडक अमंलबजावणी



**अहिल्यानगर :** मा. परिवहनमंत्री श्री. प्रतापजी सरनाईक साहेब यांच्या निर्देशानुसार व श्रीमती. प्रियंका नारनवरे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०५ पासुन रा.प.अहिल्यानगर विभागात एस.टी. बसस्थानकापासुन २०० मीटर पर्यंत नो पार्किंग झोनची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरक्षा व दक्षता शाखा अहिंल्यानगर तसेच अहिल्यानगर विभागातील आगार व्यवस्थापक (व) यांच्या मार्फत प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु असुन रा.प. स्वस्तिक व रा.प. तारकपूर बसस्थानक येथे श्री. धर्मराज पाटील सुरक्षा व दक्षता अधिकारी रा.प.अहिल्यानगर, श्री. अभिजित चौधरी आगार व्यवस्थापक (व) रा.प. तारकपूर आगार, व वाहतुक पोलीस प्रशासन यांच्यासह रा.प. परिवेक्षकांसह २०० मीटर नो पार्किंग झोनची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु असुन अवैध प्रवाशी वाहतुकीची वाहने बाहेर काढण्यात येत आहेत. तसेच विभागात इतर आगारांच्या ठिकाणी संबंधित आगार व्यवस्थापक स्थानिक पोलीसांची मदत घेवुन २०० मीटर नो पार्किंग झोनची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन घेत आहेत.

## जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली सभा

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** डिस्ट्रिक्ट प्रोबेशन अँड आफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला-मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह संस्थेची ८३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झारेकर गल्ली येथील संस्थेच्या कार्यालयात जिल्हाधिकारी तथा संस्थेचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी आणि आगामी वर्षातील विविध योजनांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सभेला संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारी सदस्य तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले. त्यानंतर संस्थेचा वार्षिक अहवाल, आर्थिक वर्षातील हिशोब पत्रके, अंदाजपत्रक, हिशोब तपासणीसाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती, रिक्त पदांच्या भरतीसंदर्भातील प्रस्ताव तसेच संस्थेच्या प्रशासकीय आणि विकासात्मक कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. संस्थेच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी तसेच मुला-मुलींना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विविध सूचना आणि प्रस्तावांवर एकमताने निर्णय घेण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपाध्यक्ष अच्युतराव चौधरी, सचिव अ‍ॅड. गोविंदराव मिरीकर, अ‍ॅड. जयवंत भापकर, डॉ. शकील फातेमा शेख, खजिनदार अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, कार्यकारी सदस्य मीरा कुलकर्णी, अनुराधा आठरे, विनिता गुणे, कंचन रच्चा, प्राची देशमुख, डॉ. अमित बडवे, संस्थेच्या अधीक्षिका पौर्णिमा माने, सीए रोहित बोरा, जिमबा अधिकारी संजय कदम, संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

सभेदरम्यान जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते संस्थेच्या कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. उपस्थितांनीही पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संस्थेतील मुला-मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य, संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक सहभाग यांना विशेष महत्त्व देण्याची गरज अधोरेखित केली.

## निंबळक येथे महिला आरोग्य जनजागृती शिबिर



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती तसेच जागतिक मासिक पाळी स्वच्छता सप्ताहानिमित्त निंबळक येथे विशेष महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. महिलांचे आरोग्य चांगले तर कुटुंबाचे आरोग्य चांगले या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास महिला व किशोरी मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फौंडेशन व सोशल कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे तसेच सरपंच प्रियंका अजय लामखडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फौंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका शेळके, हर्षल आगळे, डॉ.अमित पवार, डॉ. सुमित आबेकर, डॉ. सतीश गेरंगे, ग्रामसेवक रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, किशोरी मुली तसेच स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### पोस्टल सोसायटी आर्थिक न राहता

## कर्मचाऱ्यांच्या कल्याणाचा विचार करणारी संस्था : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** अहमदनगर पोस्टल सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन रामेश्वर ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर मध्ये उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात आ. अक्षय कर्डीले यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आ. कर्डीले यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले, पोस्टल सोसायटीने केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था न राहता सभासदांच्या कल्याणाचा विचार करणारी संस्था म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. १०६ वर्षांची परंपरा ही संस्थेच्या पारदर्शक कारभाराची आणि सभासदांच्या विश्वासाची पावती आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या काळात सहकारी संस्था टिकविणे आव्हानात्मक असताना पोस्टल सोसायटीने १०६ वर्षे यशस्वी वाटचाल करणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. यावेळी अहिल्यानगरचे आय पी.ओ.एस अधीक्षक विकास पालवे यांनी पोस्टल विभागातील बदलत्या काळाची गरज आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. या विभागातील कर्मचाऱ्यांच्या हितासाठी पोस्टल सोसायटी सातत्याने करत असलेले काम कौतुकास्पद आहे.

संस्थेने यावर्षीही ऑडिट ‘अ’ वर्ग कायम ठेवला असून सभासदांना कायम ठेवींवर ११ टक्के व्याज व शेअर्सवर ७ टक्के लाभांश देण्यात आला आहे. यावेळी वरिष्ठ पोस्टमास्तर अमृत कुमटकर, ऑल इंडिया पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप-सीचे जनरल सेक्रेटरी सुरेंद्र पालव, मुंबई सोसायटीचे मानद सचिव महेश सावंत, सहाय्यक डाक अधीक्षक बाळासाहेब बनकर, अमित देशमुख, सुनील कुलकर्णी, निसार शेख, महेश तामटे, प्रमोद कदम, सलीम शेख, स्वप्ना चिलवर, अर्चना दहिंडे, सतीश येवले, सचिन अस्वर, संदीप मिसाळ, सुखदेव पालवे, धनंजय दैठणकर, कविश्वर ताकपेरे, राजेंद्र राहिंज, सचिन गायकवाड, गणेश केसकर, अमोल बोरुडे, अंबादास सुद्रीक, बलराम दाते, सुनील चांडोले, कैलास भुजबळ, गोरक्ष आचार्य, जय मडावी, अर्जुन जटाळे, शंकर कडभणे, हर्ष कांबळे, आजीनाथ खेडकर, सुनील जाधव, सागर जाधव, शुभांगी मांडगे, ज्योती कांबळे, पदमराज पडलवार, संतोष झावरे, संचिता गाडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. प्रमोद कदम यांनी आभार मानले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त सिव्हिल हॉस्पिटल, कुष्ठधाममध्ये फळे वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त अजित पवार गटाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत सिव्हिल हॉस्पिटल आणि कुष्ठधाम येथील रुग्णांना विविध प्रकारच्या फळांचे वाटप करण्यात आले. पक्षाचा वर्धापन दिन केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि उपचार घेत असलेल्या रुग्णांमध्ये जाऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी नेहमीच सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक योजनांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. पक्षाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना न्याय मिळावा, त्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचावेत आणि विकासाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. ते पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वाटचाल ही केवळ राजकारणापुरती मर्यादित नसून सामाजिक उत्तरदायित्व जपणारी आहे. राज्यभर मजबूत संघटन उभी करून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले. त्यांच्या विचारांवर चालत पक्षाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील. पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक जाणीवेतून हा उपक्रम राबवून सिव्हिल हॉस्पिटल व कुष्ठधाम येथील रुग्णांना विविध प्रकारची फळे वाटप करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णांची विचारपूस करत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली तसेच लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, मयूर बांगरे, महेश तवले, वैभव ढाकणे, नितीन घोडके, दीपक खेडकर, सुरज कोतकर, सुरज शिंदे, गणेश बारस्कर आदी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पक्षातील विविध पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देत पक्षाच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि सर्वसामान्य नागरिकांप्रती असलेली संवेदनशीलता जपत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुढील काळातही विविध लोकहिताचे उपक्रम राबविणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांना ११ लाखांचा दंड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** शहरात वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध शहर वाहतूक शाखेने धडक मोहीम हाती घेतली आहे. १ जून ते ८ जून या आठ दिवसांच्या कालावधीत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना तब्बल ११ लाख ४ हजार ७५० रुपयाचा दंड आकारण्यात आला आहे. यातील ८९ हजार १०० रुपये दंड रोख स्वरुपात वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी दिली.

वाहतूक शाखेने दिलेल्या माहितीनुसार, मागील आठ दिवसांच्या वाहतूक नियमांची पायमल्ली करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी काळात एकूण १७९ ई-चलान फाडण्यात शहर वाहतूक शाखेत आणलेली वाहने. आली आहेत. हेल्मेट न वापरणाऱ्या २९ वाहन चालकांकडून २९ हजार रुपयाचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, अवैध प्रवासी वाहतुकीचे २० गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. मद्यपान करून वाहन चालवल्याप्रकरणी एका चालकावर कारवाई ट्रिपल सीट प्रवास, धोकादायक पद्धतीने वाहन चालवणे आणि वाहनांमध्ये अनधिकृत बदल (उदा. काळी काच, फॅन्सी नंबर प्लेट, सायलेन्सर बदलणे) करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने पार पाडली. पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्यास देऊ नये, वैध वाहन परवाना असल्याशिवाय वाहन चालवू नये, वाहन चालवताना परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, विमा आणि प्रदूषण प्रमाणपत्र सोबत ठेवावे, वाहनांवर काळी काच लावू नये आणि फॅन्सी नंबर प्लेट किंवा अनधिकृत बदल करू नयेत, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास टाळावा आणि हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी चालकांनी सीट बेल्ट लावणे अनिवार्य आहे, वाहन चालवताना वापर टाळावा, वेगमर्यादेचे पालन करावे आणि ट्रॅफिक सिग्रल व झेब्रा क्रॉसिंगचे नियम पाळावेत,

प्रो. फी. जमा. रु.
पान.नं. दि. १०/०६/२०२६
**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**
चौ.अ.नं. २६२/२०२६

अर्जदार
श्री. प्रमोद मोहनराव गर्जे, रा. शेवगाव
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. प्रमोद मोहनराव गर्जे, रा.शेवगाव ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर यांचे आजोबा केशव यशवंत राजे यांचा मृत्यु दिनांक ०४.०७.२००४ रोजी मौजे शेवगाव ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे मृत्यू चा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म/मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची आई नोंदणी प्रमाणपत्र (जन्म/मृत्यू दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजन कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे आजोबाचे जन्म/मृत्यू नोंद पंचायत समिति कार्यालय/ग्रापंचायत कार्यालय यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.सदर अर्जदार याने नगरपरिषद/ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म/मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म/मृत्यूची नोंद नसलेबाबत दि. ०८.०१.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म / मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचे आजोबा नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे, कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहु जन्म / मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत दि. २७/०६/२०२६ पूर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. ०८/०६/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

(शिक्का) **हुकमावरुन**
सही/-
**तहसिलदार शेवगाव**

द • ख • ल

## प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सेवक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी संतोष पुरोहित तर व्हा.चेअरमनपदी भारती मोरे

**भोर :** भोर शहर प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित भोरच्या चेअरमनपदी संतोष पुरोहित, व्हा. चेअरमनपदी भारती मोरे तर खजिनदारपदी विनायक धुमाळ यांची निवड करण्यात आली.सचिवपदी केशव तुकाराम पवळे यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. अध्यासी अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक आदिनाथ पालवे आणि संजय पवार यांनी काम पाहिले.यावेळी मावळते अध्यक्ष मोहन ताकवले, उपाध्यक्ष सुरेश वाडकर, खजिनदार बजरंग सापे,सोमनाथ सोडमिसे,सुदाम पारठे , आशालता सुतार, वंदना किरवे,विजय दानवले उदय लाळे, दत्ता मळेकर आदी उपस्थित होते.सहाय्यक निबंधक अदिनाथ पालवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले,संचालक मंडळाकडून सभासदांची अडवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच पतसंस्थेचा कारभार पारदर्शी करावा असा सल्ला दिला.सध्या संस्थेच्या ठेवी २५ लाख असून राखीव निधी १ कोटी व कर्ज वाटप ४.२५ लाख आहे.तर भागभांडवल ३.५०लाख असल्याचे सचिव केशव पवळे यांनी सांगितले. सर्वांनां विचारत घेऊन सभासद हिताचे निर्णय घेतले जातील असा विश्वास नवनिर्वाचित चेअरमन संतोष पुरोहित यांनी व्यक्त केला.



## भोरला रिक्षात ओढून घेत तरुणीचा विनयभंग ; तरुणावर गुन्हा दाखल

**भोर :** शाळेतून घरी जाणाऱ्या तरुणीचा हात धरून रिक्षात बस असे म्हणून तरुणीचा विनयभंग झाल्याची घटना भोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत (दि. ९)घडली असून तरुणावर पोक्सो अंतर्गत गुन्हाची नोंद करण्यात आली आहे. विजय साळेकर असे आरोपीचे नाव असून याप्रकरणी पीडितेच्या वडीलांनी भोर पोलीसांत फिर्याद दिली आहे.याप्रकरणी माहिती अशी, संबंधित पीडिता शाळेतून घरी चालली होती. दरम्यान आरोपी साळेकर याने तिला रिक्षा आडवी मारून तिचा उजवा हात पकडला तसेच तिला रिक्षात ओढून जवळ घेतले. तू शेतामध्ये येतेस का अशी विचारणा केली.आता आली नाहीस तर संध्याकाळी येणार का असे म्हणून पीडितेचा मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे फिर्यादित म्हटले आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १२६(२),७४ सह पोक्सो कलम ८/१२ नुसार भोर पोलिसांत गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून प्रभारी पोलीस निरीक्षक निलेश माने यांचे मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शिला खोत, अभय बर्गे पुढील तपास करीत आहेत.

## पूर्व आंबेगावात युरियाचा तुटवडा साठेबाजीची चर्चा, चौकशीची मागणी

**लोणी धामणी :** खरीप हंगामाला सुरुवात झाल्यानंतर आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात युरिया खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर युरियाची गरज असताना अनेक कृषी सेवा केंद्रांमध्ये युरिया उपलब्ध नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना युरिया खतासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ज्या कृषी सेवा केंद्रांकडे युरियाचा साठा उपलब्ध आहे, तेथेही सर्व शेतकऱ्यांना समान पद्धतीने खत वितरित केले जात नसल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी ठरावीक शेतकऱ्यांनाच युरिया दिला जात असल्याचे सांगितले जात आहे. तर काही कृषी सेवा केंद्रांकडून कृषी औषधे अथवा इतर साहित्य खरेदी केल्याशिवाय युरिया दिला जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान, आंबेगावच्या पूर्व भागातील काही कृषी सेवा केंद्र चालकांनी युरियाचा साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण केल्याची चर्चा शेतकरी वर्तुळात सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. युरिया खताचा पुरवठा सुरळीत राहावा तसेच कोणत्याही प्रकारची साठेबाजी, काळाबाजार किंवा शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्यास त्यावर तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय कृषी अधिकाऱ्यांनी आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील कृषी सेवा केंद्रांची विशेष तपासणी मोहीम राबवून दोषी आढळणाऱ्या कृषी केंद्रांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गाने केली आहे.

# समाजप्रबोधनाची ताकद साहित्यात दत्ता भोंगळे यांना राज्यस्तरीय पत्रकार रत्न जीवनगौरव पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**धाराशिव :** अंधश्रद्धा, सामाजिक विषमता, अन्याय आणि संघर्ष याविरोधात साहित्यिक आपल्या लेखणीतून प्रभावीपणे प्रहार करीत असतात. लोकशाही व्यवस्थेवर वैचारिक अंकुश ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य साहित्य करत असून समाजप्रबोधनाची ताकद साहित्यामध्ये आहे, असे प्रतिपादन धाराशिव-कळंब मतदारसंघाचे आमदार कैलास घाडगे-पाटील यांनी केले. धाराशिव येथे २९ मे रोजी लोकनेते अजित पवार साहित्यनगरी येथे आयोजित ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात ते बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नंदकुमार राऊत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अजित पवार यांना अभिवादन करण्यात आले. आमदार कैलास घाडगे-पाटील यांच्या हस्ते अजित पवार व साहित्य शिरोमणी भास्कर चंदनशिव यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच संमेलनाध्यक्ष डॉ. नंदकुमार राऊत आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांचा



सत्कार करण्यात आला.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. परिषदेचे राष्ट्रीय विश्वस्त गुरु भांगे यांनी ग्रंथदिंडीचे पूजन केले. त्यानंतर हरिनामाच्या गजरात शहरातून ग्रंथदिंडीची प्रदक्षिणा काढण्यात आली. यावेळी बोलताना राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी राजकारणी, साहित्यिक आणि विचारवंत यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारसरणीबरोबरच छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन त्यांनी केले.

संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नंदकुमार राऊत यांनी लोकजीवन, लोकसंस्कृती आणि मराठी भाषेच्या जतन-संवर्धनासाठी साहित्यिकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. मराठी भाषेची अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी समाजाने एकत्रित प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

या संमेलनात १८ पगड १२ बलुते चॅरिटेबल ट्रस्टचे राज्य प्रसिद्धी प्रमुख तथा पुरंदर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक दत्ता भोंगळे यांना पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाबद्दल राज्यस्तरीय पत्रकार रत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार आमदार कैलास घाडगे-पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याच कार्यक्रमात पत्रकार विनोद राऊत आणि पत्रकार गणेश मोरे यांना पत्रकार रत्न, साहित्यिक किशोर टिळेकर यांना साहित्यरत्न, साक्षी जामदार यांना युवा साहित्यरत्न, अनुजा मोहिते यांना सामाजिक रत्न तसेच उद्योजक बापूसाहेब कोळपे यांना उद्योजक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या राष्ट्रीय सचिव सुवर्णा पवार, माजी नगराध्यक्ष मकरंद राजे निंबाळकर, राष्ट्रीय उपाध्यक्षा शुभांगी काळभोर, कर्नाटक राज्याध्यक्ष रवींद्र पाटील, उद्योजक सुरेश बिराजदार, महेंद्र दुर्गुडे, सचिन तावडे, राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे, मराठवाडा प्रदेशाध्यक्ष परमेश्वर पालकर, उपाध्यक्ष तुकाराम गंगावणे, डॉ. हनुमंत चिकने, सरला खोसे, फुलचंद नागटिळक, संदीप देशमुख, मनीषा पाटील, सतीश पाटील, विठ्ठल माने, सुनील लोणकर, बळीराम सोनवणे, मंगेश गायकवाड, सुजाता गुरव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

संमेलनाचे प्रास्ताविक राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी केले. सूत्रसंचालन भाग्यश्री देवकाते यांनी केले तर आभार मराठवाडा प्रदेशाध्यक्ष परमेश्वर पालकर यांनी मानले. संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी आमदार कैलास घाडगे-पाटील आणि राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार व कर्मचारी मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव :** आदिवासी विकास विभागातील वसतिगृहे व आश्रमशाळांमध्ये प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी बांधव व भगिनींचा सत्कार समारंभ घोडेगाव प्रकल्पस्तरीय वर्ग ४ कर्मचारी संघटनेच्या वतीने उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात माननीय प्रकल्प अधिकारी श्री. प्रदीप देसाई यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी सत्कारमूर्तींनी आपल्या सेवाकाळातील अनुभव, कार्याचा आढावा आणि अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच संघटनेने केलेल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



कार्यक्रमात बोलताना प्रकल्प अधिकारी श्री. प्रदीप देसाई यांनी वर्ग ४ कर्मचारी हे विभागाचे खरे आधारस्तंभ असल्याचे सांगत त्यांच्या सेवाभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देत, निवृत्तीनंतरची पेन्शन व इतर प्रलंबित कामे तत्परतेने मार्गी लावण्याची ग्वाही दिली.

याच प्रसंगी घोडेगाव प्रकल्पस्तरीय वर्ग ४ कर्मचारी संघटनेच्या वतीने कर्मचारी मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले. वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या विविध अडचणी व प्रश्न सोडविण्यासाठी संघटना किती महत्त्वाची आहे, यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्रशासनाशी योग्य संवाद व चर्चेद्वारेच कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटू शकतात, त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने संघटनेसाठी वेळ देऊन तिच्या बळकटीकरणासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. संघटनेच्या विविध मागण्यांबाबतचे काही ठराव यावेळी सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

कार्यक्रमास राज्यस्तरीय अध्यक्ष विजय चव्हाण, सचिव सुनील घुगे, कार्याध्यक्ष प्रवीण माडावी, उपाध्यक्ष लाला भाऊ माडावी, उमेश पाटील, अजय दुलगज, मार्गदर्शक नारायण गिरासे, कोषाध्यक्ष गोविंद बांगर, राज्य कार्यकारिणी सदस्य विनायक वाघ, सागर रायकर, निलेश राणा, महासंघाचे कोषाध्यक्ष राक्षे साहेब, घोडेगाव प्रकल्पस्तरीय अध्यक्ष रविंद्र खरात, संजय मुंडे, नरेंद्र शिंदे, प्रवीण काळदाते, लक्ष्मण मोरे, लक्ष्मण पवार, समीर पठाण, रमेश भांगरे, प्रियंका खमसे तसेच घोडेगाव प्रकल्पातील सर्व वर्ग ४ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी घोडेगाव प्रकल्पस्तरीय अध्यक्ष रविंद्र खरात यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# शनिशिंगणापूर देवस्थानाचे प्रसादालय नऊ महिन्यांपासून बंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** जगप्रसिद्ध शनैश्वर देवस्थानात भाविकांसाठी सुरू असलेले महाप्रसादालय गेल्या नऊ महिन्यांपासून बंद असल्याने दररोज हजारो भाविकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रसादालय तातडीने सुरू करण्याची मागणी भाविक, स्थानिक नागरिक आणि व्यापारी वर्गातून होत आहे.

देवस्थानाच्या वाहनतळाजवळील भव्य प्रसादालयात दररोज सुमारे दोन ते अडीच हजार भाविक भोजनाचा लाभ घेत होते. अल्प दरात चपाती, भाजी, वरण-भात, शिरा आदी पदार्थांचा महाप्रसाद उपलब्ध करून दिला जात होता. या उपक्रमासाठी देश-विदेशातील दानशूर व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात देणग्याही दिल्या होत्या. ऑस्ट्रेलियातील उद्योजकांनी सुमारे पावणे दोन कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक किचन यंत्रणाही उपलब्ध करून दिली होती.

अंतर्गत विकासकामांसाठी ७ सप्टेंबर २०२५ पासून प्रसादालय तात्पुरते बंद करण्यात आले होते. मात्र त्यानंतर देवस्थान व्यवस्थापनात झालेल्या प्रशासकीय बदलांमुळे ते अद्याप सुरू होऊ शकलेले नाही.

दरम्यान, प्रसादालय सुरू करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून तांत्रिक तपासणीचे काम सुरू असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी दिली. पात्र निविदाधारकांचे दर उघडल्यानंतर कार्यादेश देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या सुट्ट्यांमुळे शनिशिंगणापूर येथे भाविकांची मोठी गर्दी होत असून प्रसादालय लवकर सुरू करण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

# रेशनकार्डधारकांच्या निवडीचे निकष बदला अन् कमिशनमध्येही वाढ करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :-** रेशनकार्डधारकांच्या निवडीचे निकष बदलावेत तसेच दुकानदारांचे कमिशन प्रति क्विंटल ५०० रुपये करावे अशी आग्रही मागणी शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांनी या वेळी केली असून इतर ही रास्त मागण्या पुणे जिल्हा स्वस्त धान्य व केरोसीन परवानाधारक संघटनेच्या प्रतिनिधींच्या बैठकीत करण्यात आल्या. ही बैठक पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील गहुंजे येथे नुकतीच पार पडली.

बैठकीत रेशन व्यवस्थेशी संबंधित विविध अडचणी, वाढती महागाई आणि परवानाधारक दुकानदारांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यात आली. जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल, शिरूर तालुका अध्यक्ष गणेश रत्नपारखी,जुन्नरचे



सुनील गुंजाळ, मावळ तालुका अध्यक्ष बाबूलाल नालबंद, तालुका कार्याध्यक्ष अंकुश आंबेकर, मुळशी तालुकाध्यक्ष संतोष सातपुते,उपाध्यक्ष प्रकाश बुचडे,योगेश मरळ,पुरंदरचे अशोक अण्णा दळवी,आंबेगाव चे सतीश घोलप यांच्यासह विविध तालुक्यांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत सध्या लागू असलेले रेशन कार्ड धारकांच्या पात्र लाभार्थी निवडीचे निकष कालबाह्य ठरल्याचे मत व्यक्त करण्यात आले. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर हे निकष बदलून अधिकाधिक पात्र नागरिकांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी जोरदार करण्यात आली.जीवनावश्यक वस्तू व सेवांचे वाढलेले दर लक्षात घेऊन रेशन दुकानदारांना मिळणारे कमिशन किमान प्रति क्विंटल ५०० रुपये करण्यात यावे,अशी मागणी संघटनेच्या बहुसंख्य पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रेशन व्यवस्थेद्वारे पाच जीवनावश्यक वस्तूंचे वितरण सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे ही बैठकीत नमूद करण्यात आले.

### प्रलंबित मागण्यांबाबत एकमताने निर्णय

बैठकीत उपस्थित असलेल्या ३५ पेक्षा अधिक प्रतिनिधींनी सर्व प्रलंबित मागण्यांवर एकमताने निर्णय घेतला. तसेच विविध अडचणींबाबत शासनाकडे निवेदन सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### रेशनकार्डधारकास किमान चार लिटर केरोसीन द्या

चालू जून महिन्यासाठी मंजूर करण्यात आलेले केरोसीन अत्यल्प प्रमाणात असल्याने प्रत्येक रेशनकार्डधारकाला किमान चार लिटर केरोसीन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. यामुळे एलपीजी गॅस सिलिंडरवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होईल, असे प्रतिनिधींनी सांगितले.

### मिळणारे कमिशन पाच महिने प्रलंबित

रेशन दुकानदारांना मिळणारे कमिशन चार ते पाच महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत नियमितपणे कमिशन अदा करावे, अशी मागणी करण्यात आली.

तसेच पॉस मशीनमध्ये वारंवार येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याची गरज असल्याचेही या बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

# जुन्या नव्या आठवणीत रमले नायगावच्या विद्यालयचे माजी विद्यार्थी...

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील श्री सिद्धेश्वर विद्यालयातील सन १९९३ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा एक स्नेह मेळावा नुकताच संपन्न झाला.त्या काळातील गुरुजन, प्रयोगशाळा परिचर, शिपाई मामा आणि त्या वेळच्या वर्गातील नायगाव, राजुरी, रिसे पिसे आदी गावातील सुमारे चाळीस विद्यार्थ्यांची आनंद दायी हजेरी कार्यक्रमाची रंगत वाढवणारी ठरली. त्या काळात ज्ञानदानाचे काम करणारे बारीकराव खेसे, भानुदास खेसे, मोहन वैद्य रामदास चौधरी याच बरोबर प्रयोगशाळा परिचर रघुनाथ जगदाळे व शिपाई काका वसंत दरेकर यांची उपस्थिती विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळवून गेली

छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पुजन व राष्ट्रगीता ने कार्यक्रमाची सुरवात झाली सर्व गुरुजनांना नारळ रोप देवून सन्मानीत करण्यात आले.संपत कड, सीमा गायकवाड, प्रवीण कड, सुरेखा चौंडकर,




बाळासाहेब कड, संध्या दरेकर, नितीन जगताप, बेबी जगताप, दत्ता भगत, संतोष चाफेकर अरविंद खेसे, रमेश शिंदे, मंजुश्री हेंद्रे, संजय भगत यांनी या प्रसंगी आपल्या शालेय जीवनातील अनेक आठवणींना उजाळा दिला.गोपीचंद खेसे यांची गौळण व मंदा चौंडकर यांचे गीत उपस्थितांच्या टाळ्या मिळवून गेले सर्व शिक्षकांनी मनोगते मांडत मुलांच्या त्या काळातील स्वभाव, खोड्या, गरिबीतील दिवस, संस्कार, शिस्त या सगळ्या बाबींचा उल्लेख करत सर्वजण एक उत्तम नागरिक बनल्या बद्दल आनंद व्यक्त केला. देविदास ताम्हाणे, संजय भगत, सुहास पाटोळे यांसह सर्वच विद्यार्थी मित्रांनी या सोहळ्याचे उत्तम आयोजन केले श्यामराव चौंडकर यांनी सूत्रसंचालन तर बाळासाहेब कड यांनी प्रास्तविक केले. संपत कड यांनी आभार मानले सर्वांनीच वर्षातून किमान एकदा तरी भेटायचं असा निर्धार करत स्नेहभोजनाने या सोहळ्याची सांगता झाली.

# लोणी येथे दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

## पारगाव पोलिसांत गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील लोणी गावच्या हद्दीत जेजुरी-बेल्हा महामार्गावर रविवारी (दि. ८ जून) सकाळी झालेल्या दुचाकी अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून या प्रकरणी पारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेजुरीकडून बेल्ह्याकडे जाणारी पल्सर दुचाकी (एमएच १४ ईजे ६३७६) चालक प्रकाश बाबाजी दौड (रा. पोंदेवाडी, ता. आंबेगाव) हे भरधाव व निष्काळजीपणे चालवत असताना त्यांच्या दुचाकीने समोर जाणाऱ्या ॲक्टिव्हा स्कुटीला (एमएच १२ वायएम ०६४२) पाठीमागून जोरदार



धडक दिली.

या अपघातात ॲक्टिव्हा चालक सुभाष रामभाऊ जाधव (वय ५२, रा. एकेरीमळा, पाबळ, ता. शिरूर) यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. तसेच अपघातात दुचाकी चालक प्रकाश दौड यांनाही किरकोळ दुखापत झाली असून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

याप्रकरणी शिवाजी रामभाऊ जाधव (वय ५६, रा. एकेरीमळा, पाबळ, ता. शिरूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६१/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ)(ब), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार जढर (बकल क्रमांक २२५२) करीत असून प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# विशेष सखोल मतदार पुनर्निरीक्षण मोहिम यशस्वी करा : मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात विशेष सखोल मतदार पुनरिक्षण (एसआयआर) मोहीमेअंतर्गत मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, याबाबत नागरिकांना वस्तूनिष्ठ माहिती होण्याकरिता व्यापक स्वरुपात जनजागृती, शंकाचे निरसन, लोकप्रतिनिधींचा सहभाग, सामाजिक संस्था आदी घटकांना विश्वासात घेवून मतदार यादी अद्ययावत करावी. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना त्रास होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. एसआयआर मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी मिळून समन्वयाने कामे करावीत, असे निर्देश अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विशेष सखोल मतदार पुनरिक्षण (एसआयआर) मोहीमेबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, यांच्यासह मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

श्री. चोकलिंगम म्हणाले, एसआयआर मोहिमेच्या उद्देशाबाबत मुद्रित, इलेक्ट्रानिक, समाज माध्यम तसेच रेडिओद्वारे व्यापक स्वरुपात जनजनागृती करावी. एसआरच्या अनुषंगाने माहिती देण्याकरिता मदत कक्ष कार्यान्वित करा. नागरिकांच्या शंकांबाबत बैठक घेवून त्याचे निराकरण करावे, बैठकीत वस्तूस्थितीदर्शक माहिती त्यांच्यासमोर मांडावी. प्रशासनाने स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवक आदी घटकांना सोबत घेवून काम करावे.

भारतीय नागरिकाबाबत सर्वोच्च न्यायलायाचे न्यायनिर्णय, भारतीय लोकप्रतिनिधी कायदा, भारतीय संविधानातील तरतुदींचा अभ्यास करुन काम करावे. एकही पात्र नागरिक मतदार यादीतून वगळण्यात येणार नाही, तसेच कोणत्या परिस्थितीत अपात्र नागरिक मतदार यादीत समावेश होणार नाही, मतदार यादीतील नावे खात्री करुनच कमी करावी. यादृष्टीने सुक्ष्मनियोजन करुन काम करावे. महसूल विभागासोबतच आवश्यकतेप्रमाणे इतर विभागाची मनुष्यबळाची नियुक्ती करावी. मतदान केंद्रनिहाय उद्दिष्ट निश्चित करुन मतदार यादी मॅपिंगच्या कामाला गती द्यावी.

एसआयआर मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील व भरलेले अर्ज परत घेण्यात येणार आहे. घरोघरी भेट देऊन पूर्वमुद्रित फॉर्मद्वारे मतदारांची माहिती पडताळणी केली जाणार आहेत. नाव, पत्ता, छायाचित्रे किंवा इतर तपशीलांमध्ये बदल असल्यास त्याची नोंद करता येणार आहे. तसेच पत्त्यावर उपस्थित नसलेले (अब्सेंट), स्थलांतरीत (शिफ्टेड), मयत (डेड) आणि डुप्लीकेट (एएसडीडी) प्रकारातील नोंदींची तपासणीही केली जाणार आहे. सन २००२ ते २००४ मधील जुन्या मतदार याद्यांशी मॅपिंग उपलब्ध असल्यास अतिरिक्त कागदपत्रांची आवश्यकता भासणार नसल्याचेही यावेळी स्पष्ट केले. शासकीय निवासस्थानामध्ये वासत्वय करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र घेवून पुढील कार्यवाही करावी.

श्री. डुडी म्हणाले, सन २००२ मध्ये जिल्ह्यात ४६ लाख ९ हजार १२७ इतके मतदार होते तर सन २०२६ मध्ये जिल्ह्यात ९० लाख ९० हजार ९७० मतदार आहेत. एसआयआर मोहीमेअंतर्गत मतदारांच्या नोंदींच्या अनुषंगाने घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहेत. याकरिता जिल्ह्यातील सुमारे ८ हजार ४१७ बीएलओ आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. एसआयआर पुर्वतयारीच्या अनुषंगाने मॅपिंग, मनुष्यबळाची नियुक्ती, प्रशिक्षण, मतदार गणना फार्मची छपाई, सुनावणी व पडताळणी प्रकिया, आवश्यक ती पूर्वतयारी करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविली जाईल तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, अशी ग्वाही श्री. डुडी यांनी यावेळी दिली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार दि.११ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## कुकडी कालव्यात अज्ञात पुरुषासह महिलेचा मृतदेह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : धालवडी (ता.कर्जत) शिवारात कुकडी कालव्याच्या येसवडी चारीत आवर्तनाच्या पाण्यात एक पुरुष आणि महिलेचा मृतदेह मिळून आला. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात अकस्मात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. कुकडी कालव्यात दोन मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार दि १० रोजी सकाळी कुकडी कालव्याच्या धालवडी-कुळधरण शिवारात पिण्यासाठी सुटलेल्या आवर्तनाच्या पाण्यात ५५ वर्षाचे अज्ञात पुरुष जातीच्या आणि ६५ वर्षाच्या महिलेचा मृतदेह येसवडी चारीत आढळून आला. कुकडी कालव्यात पुरुष आणि महिलेचा मृतदेह आढळल्याची माहिती समजताच परिसरात एकच खळबळ उडाली. कर्जत पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत भेट देत दोन्ही मृतदेह ताब्यात घेत कर्जतच्या उपजिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आले असून याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात धालवडीचे पोलीस पाटील सुनील पंडीत आणि कुळधरणचे शेतकरी गणेश जगताप यांच्या खबरीवरून अकस्मात गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

# शिर्डीच्या विश्वस्त मंडळात सुशिक्षित व समृद्ध लोकांचा समावेश करा : डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शिर्डीचा विकास व रोजगार वाढवण्यासाठी साईबाबा संस्थानला विश्वस्त मंडळाची अत्यंत आवश्यकता असून या कुंभमेळापूर्वी साईबाबा संस्थान वर विश्वस्त मंडळ असेल तसेच त्यामध्ये सुशिक्षित आणि समृद्ध लोक असावेत अशी अपेक्षा मा खा डॉ . सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली आहे.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या शिवसेना शिंदे गटाच्या प्रवेशावर ते म्हणाले की पश्चिम बंगालमधील २० खासदार यांनी एनडीए मध्ये प्रवेश केला आहे ज्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व मानले ते प्रवेश करत आहे त्याप्रमाणे भाऊसाहेब वाकचौरे शिवसेनेत आल्यास त्यांचं स्वागत करण्यात येईल. डॉ विखे काल आजाराच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर शिर्डीत दाखल झाले होते. त्यांनी शिर्डीतील नगरसेवकांची बैठक घेतली. या बैठकीत कुंभमेळ्या पूर्वी शिर्डीत विकास कामांची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला असता शिर्डीच्या अनेक समस्यावर भाष्य केले, ते म्हणाले साई संस्थांवर विश्वस्त मंडळ आले पाहिजे. ही शिर्डी ग्रामस्थांची मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून मागणी आहे. याआधी सलग आचारसंहिता लागल्या होत्या आचारसंहिता चालू असतात. विधान परिषदेनंतर यासाठी मोकळा काळ येईल आचारसंहितेनंतर प्रक्रिया पूर्ण होईल कुंभमेळापूर्वी सक्षम विश्वस्त मंडळ तयार होईल राज्याचे मुख्यमंत्री हा निर्णय घेण्यात सक्षम आहेत.



कुंभमेळ्याचे नियोजन उत्कृष्ट केले पाहिजे. दीड वर्षापासून अनेक विकास कामांची प्रस्ताव न्यायालयात पडून आहे थीम पार्कसाठी ३०कोटी रुपये तसेच अंतर्गत रस्तेसाठी संस्थांनी प्रस्ताव सादर केले आहेत. संस्थांनी आपली जबाबदारी ठराव करून पूर्ण केली आहे.

दुर्दैवाने न्यायालयीन प्रक्रियेमध्ये वेळेअभावी विलंब होत असेल तर त्याला पर्याय नाही. त्यासाठी विश्वस्त मंडळ येणे गरजेचे आहे विश्वस्त मंडळ लांबण्याचे कारण काय आणि येण्याचे कारण काय हे लवकरच स्पष्ट होईल.

### चर्चेत आलो की पता कट

आपण विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी लागेल काय अशी विचारणा केली असता ते म्हणाले की राहुरी विधानसभा आली माझे नाव चर्चेत आले विधानपरिषद मध्ये माझा पत्ता कट झाला माझे नाव चर्चेत आणू नका माझे नाव चर्चेत आले की माझा पत्ता कट होतो विखे पाटील परिवाराचा कुठलाही सदस्य गेल्या पंधरा वर्षापासून संस्थांच्या प्रक्रियेत नाही. तरीसुद्धा शिर्डीतील जनता विखे परिवाराच्या विश्वास ठेवून काम करत आहे कुणी आले तरी शिर्डीच्या विकासासाठी काम करावे लागेल .आमचा व्यक्ति दोष नाही .उद्देश एकच आहे शिर्डीचा विकास व्हावा विकासाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व्हावी. पद्मभूषण किंवा पद्मविभूषण आले विश्वस्त मंडळावर तर त्यांच्या अनुभवाचा फायदा संस्थानला नक्कीच होईल सरकार याबाबत बसून निर्णय घेईल जिल्ह्यात १९ आमदार झाले आता पालकमंत्र्यांसमोर त्यांना निधी कसा द्यायचा याची कसरत होणार आहे .मात्र महायुतीचे १९ आमदार झाल्याने महायुतीची ताकद जिल्ह्यात वाढली आहे

### मुख्यमंत्री कोल्हेंना दापतील

विधान परिषदेचे नूतन आमदार कोपरगाव चे विवेक कोल्हे यांनी राहता येथे येऊन विखे परिवारावर तूप डागली होती यावर आज डॉ. सुजय विखे म्हणाले की संघर्ष हा जीवनातला विभाज्य भाग आहे पक्ष एक असला काय आणि दोन घराघरात भांडणे होतात . एक परिवार म्हणून सर्वांनी राहिले पाहिजे . दोन भाऊ किती जरी भांडले तरी वडिलांनी दापल्यानंतर शांत होतात तसे आमचे नेते मुख्यमंत्री फडणवीस यांनी एकदा प्रेमाने सांगितले की सगळे शांत बसतील. खाली किती अवसान आणले तरी आमचे नेते फडवणीस यांनी बंद खोलीत सांगितले तर सर्व विषय संपून जातो . आमची भांडणे नाही झाली तर तुमचा टीआरपी कसा वाढणार म्हणून आम्ही बोलत राहतो अशी मुश्किल टिपणी त्यांनी विवेक कोल्हे यांचे नाव घेता न घेता केली.

### नगरपालिका रेस्टॉरंट तपासणी करणार

नगर परिषदेच्या वतीने प्रत्येक जण जबाबदारी वाटून प्रत्येक रेस्टॉरंट मध्ये चौकशी करून तपासणी करणार आहे . नगरपालिका कार्यक्षेत्रात राहून कारवाई करण्यात येईल सोसायटीच्या माध्यमातून विकले विक्री केलेले पेढेच भाविकांनी घ्यावे. एफडीए कडे यंत्रणा कमी असल्याने कामाला वेग नाही आता नवीन अधिकारी आले आता कारवाई सुरू केली जाईल गुन्हेगारी मुक्त शिर्डी शंभर टक्के पर्यत पोहोचले आहे . शिर्डी भेसळयुक्त होऊ नये यासाठी निश्चित पावले उचलले जातील.

## कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर अपघात

### पंढरपूरहून परतणारे बोटा येथील ५ भाविक गंभीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : कल्याण-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर जुन्नर तालुक्यातील गुळंजवाडी गावच्या हद्दीत आज, बुधवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास दोन वाहनांची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. पंढरपूर येथे विठ्ठलाचे दर्शन घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील बोटा (ता. संगमनेर) या आपल्या गावी कार क्रमांक एमएच १४ एनडी ३३७८ परतत असलेल्या भाविकांच्या वाहनाला समोरून येणाऱ्या दुसऱ्या एमएच २४ बीडब्लू २८६२ या क्रमांकाच्या पीकअप वाहनाने जोरदार धडक दिली. हा अपघात इतका तीव्र होता की दोन्ही वाहनांच्या दर्शनी भागाचा चक्काचूर झाला. पिकअप वाहनांचा वेग अधिक असल्याने कारमधील प्रवासी गंभीररीत्या जखमी झाले. या दुर्घटनेत जिजाभाऊ दत्तात्रय शेळके, गाडीचे चालक शिवाजी शांताराम मेंगाळ, बाळासाहेब भागाजी मुसळे, सुभाष तुकाराम शेळके आणि आनंदा रामभाऊ मधे (सर्व रा. बोटा, ता. संगमनेर) हे पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताचा आवाज ऐकून गुळंजवाडी परिसरातील ग्रामस्थ आणि महामार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांनी दाखवलेल्या समयसूचकतेमुळे अपघातग्रस्त वाहनात अडकलेल्या जखमींना तातडीने बाहेर काढण्यात आले. रुग्णवाहिकेच्या साहाय्याने सर्व पाचही जखमींना आळेफाटा येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच आळेफाटा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी क्रेनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. या अपघाताचा पुढील तपास आळेफाटा पोलीस करत आहेत.


## मृगाच्या पावसाची प्रतीक्षा; खरीप तयारी अंतिम टप्प्यात

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : तालुक्यातील ग्रामीण भागात मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला लागले आहेत. पेरणीपूर्व मशागतीची बहुतांश कामे अंतिम टप्प्यात पोहोचली असून शेतकरी आता पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. यंदा हवामान विभागाने समाधानकारक पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने शेतकऱ्यांमध्ये आशावादाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे बियाणे व खतांच्या खरेदीलाही वेग आला आहे.

२५ मे पासून रोहिणी नक्षत्राला सुरुवात झाली असून आता शेतकऱ्यांचे लक्ष ७ जूनपासून सुरू होणाऱ्या मृग नक्षत्राकडे लागले आहे. मृग नक्षत्रात चांगला पाऊस झाल्यानंतरच पेरणीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होईल, असे अनुभवी शेतकरी सांगत आहेत.

मात्र दुसरीकडे वाढत्या महागाईमुळे बळीराजा अडचणीत सापडला आहे. खतांच्या वाढलेल्या



किमती, शेतीमालाला मिळणारा अपुरा दर आणि कर्जमाफीबाबतच्या नाराजीमुळे आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांवर आता पेट्रोल-डिझेल दरवाढीचे ओझे पडले आहे. ट्रॅक्टर, पंपसेट, नांगरणी, वखरणी, हार्वेस्टर तसेच मजूर वाहतुकीसाठी लागणाऱ्या डिझेलच्या वाढलेल्या किमतींमुळे शेतीचा खर्च लक्षणीय वाढला आहे. शेतीची अवजारेही महाग झाल्याने अनेक शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. महागाई संदर्भात ग्रामीण भागात शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष आहे.

दरम्यान, खरीप हंगामासाठी आवश्यक खते व बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांना कोणतीही कमतरता भासणार नसल्याचा दावा करण्यात आला असला, तरी बाजारात मागणी असलेल्या काही बियाणे आणि खतांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पावसासह कृषी साहित्याच्या उपलब्धतेकडेही शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# टाकळीभान ग्रामपंचायत आरक्षण सोडत प्रसंगी गदारोळ

### वरिष्ठांकडे हरकत नोंदविण्याचे मंडळाधिकारी रोहिणी आघाव यांचे आवाहन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : टाकळीभान ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकिची प्रभाग आरक्षण सोडत कार्यक्रम १० जुन रोजी ग्रामपंचायत ग्रामसचिवालयाच्या सभागृहात अध्यक्ष अधिकारी मंडालाधिकारी रोहीणी आघाव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली परंतु यावेळी प्रभाग ३ व प्रभाग ५ च्या सोडती वरुन पडलेले आरक्षण मान्य नसल्याने सभेत चांगलाच गोंधळ झाला. व काही ग्रामस्थांनी चुकीचे आरक्षण पडल्याने ते मान्य नसल्याचे सांगितले.

यावेळी सभा रद्द करण्याची मागणी यावेळी काही उपस्थितांनी केली. यावेळी मंडळाधिकारी आघाव मॅडम यांनी शासनाच्या जीआर व नियमाप्रमाणे आरक्षण पडले असल्याचे सांगितले. टाकळीभान ग्रामपंचायतीची निवडणुक



प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पुढे सरकत आहे. काल प्रभाग प्रभाग आरक्षण सोडत कार्यक्रम टाकळीभान महसुल मंडळाच्या मंडळाधिकारी रोहीणी आघाव यांच्या आध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळी २०११ च्या लोकसंख्येच्या निकषानुसार प्रभाग क्र. १ मध्ये सर्वसाधारण व्यक्ति, सर्वसाधारण स्त्री, अनु.जाती स्त्री. प्रभाग २ मध्ये नामाप्र पु. सर्वसाधारण पु. सर्वसाधारण स्त्री. प्रभाग क्र. ३ मध्ये अनु. जमाती पु. अनु. जाती स्त्री, सर्साधारण स्त्री. प्रभाग ४ मध्ये अनु. जाती पु. व सर्वसाधारण पु. प्रभाग ५ मध्ये अनु.जाती पु., नामाप्र स्त्री, सर्वसाधारण स्त्री. प्रभाग ६ मध्ये सर्वसाधारण पु. नामाप्र स्त्री व सर्वसाधारण स्त्री अशी आरक्षण सोडत मंडळाधिकारी आघाव यांनी जाहीर केली.

१७ सदस्य संख्या आसलेल्या या ग्रामंचायतीत ९ महीला व ८ पुरुष सदस्य आसणार आहेत. प्रभागातील लोकसंख्येच्या निकषानुसार व आरक्षित प्रभागात ५० टक्याची मर्यादा ठेवुन सर्वसाधारण पु, ४, सर्वसाधारण स्त्री ५, अनु. जाती पु.२, अनु. जाती स्त्री २, नामाप्र पु.१, नामाप्र स्त्री २ तर अनु, जमाती पु. १ जागेवर प्रतिनिधित्व करणार आहे. यापुर्वी झालेल्या सरपंच आरक्षण सोडतीत सरपंच पद आनु. जमाती पुरुषासाठी आरक्षित झाले आसल्याने यंदा सरपंच पद प्रभाग ३ ला मिळणार आहे. या सोडतीवेळी काही प्रभागातील आरक्षणात बदल झाला नसल्याने घडाळाच्या काट्याप्रमाणे प्रभाग आरक्षण करावे अशी मागणी काही ग्रामस्थांनी केली.

याच मुद्यावर काही वेळ चांगलाच गदारोळ झाला. काही विद्यमान सदस्यांची त्या त्या प्रभागात संधी हुकल्याने त्यांचा गोंधळ आणखीनच वाढला. या गोंधळानंतर मंडळाधिकारी रोहीणी आघाव यांनी प्रभाग आरक्षण सोडत जाहीर करुन ज्यांनी आरक्षण सोडत मान्य नसेल त्यांनी त्यावर वरीष्ठांकडे हरकत घ्यावी असा सल्ला दिला.

यावेळी उपसरपंच कान्हा खंडागळे, अशोकचे कारेगाव भागचे संचालक शिवाजीराव शिंदे, बाजार समितीचे संचालक मयुर पटारे, भाऊसाहेब पवार, अशोकचे संचालक यशवंत रणनवरे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, शेतकरी संघटनेचे प्रा. कार्लस साठे, संत सावता सोसायटीचे विलास दाभाडे, प्राचार्य जयकर मगर, सुनिल बोडखे, काका रणनवरे, भाजपाचे नारायण काळे, अनिल बोडखे,अक्षय कोकणे, मोहन रणनवरे, आरविंद साळे, भाऊसाहेब गव्हाणे, भाऊसाहेब पटारे, बाजीराव साळवे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. कामगार तलाठी रुपाली रामटेके, ग्रामविकास आधिकारी भिंगारदे यांनी याकामी सहकार्य केले.

## श्रीरामपूर नगरपालिकेला मिळणार नवीन अग्निशमन वाहन : सभापती वमने

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : येथील नगरपरिषदेला प्रशासकीय काळात एक आणि मागील महिन्यात एक अशा गुरखा मॉडेलच्या दोन अग्निशामन वाहन शासनाकडून मिळाले, परंतु त्या दोन्ही अग्निशमन वाहनांची क्षमता फक्त तीनशे लिटर पाण्याची आहे.त्यामुळे सदर वाहनांचा पाहिजे तसा उपयोग नगरपरिषदेला होत नसल्याने लवकरच नवीन अग्निशमन खरेदी करणार असल्याचे आरोग्य विभागाचे सभापती दिपक वमने यांनी सांगितले. सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर होती त्यामुळे आपल्यासह जिल्यातील अनेक नगरपालिकाच्या कचरा डेपोला आग लागली आहेत. त्यावर प्रशासन लक्ष ठेऊन सदरची आग कशी आटोक्यात येईल, यासाठी प्रयत्नशील आहेत. प्रशासकीय काळात जे अग्निशमन वाहन खरेदी केले त्यात सातत्याने तांत्रिक बिघाड होत आहेत.त्यामुळे या वाहन खरेदी मध्ये झालेल्या गैरव्यव्यवहार बाबत स्वातंत्र चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याचे वमने यांनी दिली. आमदार हेमंत ओगले आणि नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूरातील जनतेच्या सोयीसुविधा पुरवण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याचे देखील सभापती दीपक वमने यांनी सांगितले आहेत.

## नेवासा येथून जेजुरीच्या खंडेरायांना धोंडयाचे निमंत्रण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा बुद्रुक ही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या खंडोबारायांची सासुरवाडी असल्याने अधिक पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने धोंडा भोजनाचे निमंत्रण खंडोबारायांना जेजुरी येथे जाऊन देण्यात आले. शनिवारी दि.१३ जून रोजी नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिर प्रांगणात धोंडा भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री खंडोबादेवा आपण पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने म्हाळसा माहेर व आपली सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथे धोंडा भोजनास यावे अशा आशयाचा मजकूर छापलेली पत्रिका नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बानाई मंदिर जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे,विश्वस्त राजेंद्र काशीद, पुरातन देवस्थान प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या हस्ते जेजुरी येथे जाऊन खंडेरायांच्या चरणी अर्पण करण्यात आली.

निमंत्रण पत्रिका अर्पण करतेवेळी श्री खंडोबारायांच्या मूर्तीचे वेदमंत्राच्या जयघोषात पूजन करण्यात आले. पुजारी निलेश बारभाई यांनी पूजेचे पौरोहित्य केले. यावेळी श्री मार्तंड देवस्थान




जेजुरी पालखी सोहळा समितीचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,पालखी मानकरी, सोमनाथ शेवाळे,देवस्थान कर्मचारी कल्याण चव्हाण, महेश शिंदे उपस्थित होते.यावेळी देवस्थान विश्वस्त मंडळासह प्रशासकीय अधिकारी यांना ही निमंत्रण पत्रिका देण्यात आल्या.

नेवासा बुद्रुक हे खंडोबारायांची पत्नी म्हाळसादेवी यांचे माहेर घर असल्याने जावई या नात्याने परंपरेनुसार खंडोबारायांना म्हाळसा माहेर असलेल्या नेवासा बुद्रुक येथून धोंडा जेवणाचे निमंत्रण तीन वर्षातून एकदा येणाऱ्या अधिक मासाच्या निमित्ताने देण्यात येते.धोंडा कार्यक्रमाच्या निमित्ताने संत महंतांसह येथील विवाहबद्ध झालेल्या लेकी जावयांना ही निमंत्रण देण्यात आले असून शनिवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास होणाऱ्या धोंडा कार्यक्रमाला ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई जीर्णोद्धार कमिटीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे यांनी केले आहे.

खंडोबारायांची सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथे परंपरेनुसार चंपाषष्ठी उत्सव देखील मोठ्या थाटात साजरा केला जातो.चंपाषष्ठीला खंडोबादेव सासुरवाडीला जेवण्यासाठी येतात आणि त्यांना प्रिय असलेली वांग्याचे भरीत व बाजरीची भाकरी खातात ही भाविकांची धारणा असल्याने दरवर्षी हा उत्सव खंडोबारायांच्या सासुरवाडीत उत्साहात साजरा केला जातो, देवांचे आगमन म्हणून पालखीतून शोभायात्रा मिरवणूक काढली जाते. वाहन म्हणून घोडयाची पूजा मिरवणूक काढून केली जाते.

शनिवारी दि. १३ जून रोजी खंडोबारायांच्या सासुरवाडी नेवासा बुद्रुक येथे धोंडा कार्यक्रमाच्या निमित्ताने सायंकाळी होणाऱ्या कार्यक्रम प्रसंगी वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक त्यानंतर तळी भंडार करण्यात येऊन धोंडा भोजन निमित्ताने पंच पक्वान्नाचा भोग खंडोबादेवांना देण्यात येणार आहे. याप्रसंगी येथील जावई बापूंचा सन्मान करण्यात येऊन उपस्थित भाविकांना धोंडा भोजन देण्यात येणार आहे.

## ऑफिस बॉयला एक लाखाची मागणी करीत जातीवाचक शिवीगाळ

### शिवसेना युवा नेते ओंकार सातपुतेसह ४ जणांविरुद्ध तक्रार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : केडगाव परिसरात घडलेल्या जुन्या वादाच्या कारणावरून एका खासगी बँकेत कार्यरत असलेल्या ऑफिस बॉयला एक लाख रुपयांची मागणी करत जातीवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी शिवसेना युवा नेते ओंकार सातपुते यांचसह चार जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

CRIME

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, निलेश साहेबराव पंचमुख (वय ३४, रा. सिंध्दाथ नगर, नवबौद्ध वस्ती, अहिल्यानगर) हे आयसीआयसीआय बँकेच्या केडगाव शाखेत कंत्राटी पद्धतीने ऑफिस बॉय म्हणून कार्यरत आहेत. २६ मे २०२६ रोजी बँकेच्या कामानिमित्त ते झेंडा चौक, केडगाव येथे गेले असता त्यांच्या पाठीमागून ट्रिपल सीट आलेल्या दुचाकीस्वारांची गाडी घसरून पडली. त्यानंतर संबंधितांनी पंचमुख यांना अडवून शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच त्यांना एका शाळेच्या परिसरात नेऊन पुन्हा मारहाण करण्यात आली. यावेळी त्यांचा मोबाईल फोन, खिशातील रोख रक्कम व त्यांच्या ताब्यातील दुचाकी घेऊन गेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. नंतर बँक व्यवस्थापकांच्या मध्यस्थीने संबंधितांनी मोबाईल, पैसे व दुचाकी परत केल्याने त्यावेळी कोणतीही तक्रार करण्यात आली नव्हती.

मात्र, ९ जून २०२६ रोजी सायंकाळी केडगाव येथील एका कार्यालयात बोलावून घेतल्यानंतर ओंकार दिलीप सातपुते, ओम किरण बारवकर, अभय कारखेले, अनिकेत शिर्के तसेच अन्य दोन जणांनी जुन्या घटनेचा संदर्भ देत मोबाईल फुटल्याची भरपाई म्हणून एक लाख रुपयांची मागणी केली, असा आरोप पंचमुख यांनी केला आहे. पैसे देण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर संबंधितांनी जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केले तसेच कामावर येऊ देणार नाही, हात-पाय तोडून टाकू अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी निलेश पंचमुख यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.